आम्ही
# पार्लेकर
१९९१ पासून
प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३२ वे | अंक सातवा | पृष्ठे १४ | जुलै २०२३ | www.parlekar.com

या अंकात

पान ०४ विलेपार्ले ते उझबेकिस्तान- एक विलक्षण प्रवास
पान ०९ ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षितता!!
पान १० विसरलेले समाज - ३ : पंट नावाचा देश
पान ११ इन्ही लोगोंने ले लीना दुपट्टा मेरा..पाकीझा



पान २
आदर्श
आर्किटेक्ट
**प्रवीण कणेकर**

Registered-RNI no. 54781/92

## दहावीचा रिझल्ट
# पार्ल्यातील विद्यार्थ्यांची यशस्वी भरारी

| शाळेचे नाव | बसलेले विद्यार्थी | एकूण विद्यार्थी | एकूण निकाल |
|---|---|---|---|
| पार्ले टिळक विद्यालय (इंग्रजी माध्यम) | २१६ | २१६ | १००% |
| पार्ले टिळक विद्यालय (आयसीएसई) | ११९ | ११९ | १००% |
| श्री. माधवराव भागवत हायस्कूल (इंग्रजी माध्यम) | १५६ | १५६ | १००% |
| ओरायन स्कूल - (आयसीएसई) | ७८ | ७८ | १००% |
| प्रार्थना समाज हायस्कूल | १२ | १२ | १००% |
| श्री. माधवराव भागवत हायस्कूल (मराठी माध्यम) | ११० | १०९ | ९९.९% |
| विले पार्ले म्युनिसिपल स्कूल | ८६ | ८५ | ९९.९% |
| पार्ले टिळक विद्यालय (मराठी माध्यम) | २४५ | २४३ | ९९.१८% |
| परांजपे हायस्कूल | ७३ | ७० | ९५.८९% |
| छत्रपती शिवाजी विद्यालय | १८ | १३ | ७२.२२% |

जून महिना म्हणताच आठवण होते पावसाची आणि शाळेच्या दिवसांची त्याचप्रमाणे जून महिना आणि दहावीचा निकाल हे समीकरण कोरोना काळानंतरही कायम आहे. २ जून २०२३ रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर झाला. कोरोना काळानंतर प्रत्यक्षरीत्या पार पडणारी ही पहिलीच परीक्षा असल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यामध्ये निकालसंबंधी तणावाचे वातावरण होते. तरीसुद्धा दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील पार्ल्यात मुलींनी बाजी मारली आहे. शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या आपल्या पार्ल्यात दहापेक्षा अधिक शाळा आहेत. यापैकी पार्ले टिळक विद्यालय आणि महिला संघ या शाळांच्या आयसीएसई तसेच इंग्रजी माध्यमाचा निकाल १००% लागला त्याचबरोबर प्रार्थना समाज विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करुन शाळेचा निकाल १००% इतका लावला आहे. कौतुकास्पद गोष्ट म्हणजे पार्ले टिळक विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमातील पूर्वा लोंढे या विद्यार्थिनीने एस एस सी बोर्डाच्या परीक्षेत १००% गुण मिळवून शाळेतच नव्हे तर मुंबई जिल्ह्यात पहिल्या क्रमांकाचे स्थान पटकावले आहे. त्याचप्रमाणे पार्ले टिळक विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमातील तन्वी हावरे या विद्यार्थिनीने एस एस सी बोर्डाच्या परीक्षेत ९९.६०% गुण संपादित करून संपूर्ण पार्ल्यात द्वितीय क्रमांक मिळवला आहे. तसेच श्रावणी तरये ह्या पार्ले टिळक विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमातील विद्यार्थीनीने एस एस सी बोर्डाच्या परीक्षेत ९९.४० % गुण संपादित करून संपूर्ण पार्ल्यात तृतीय क्रमांक मिळवला आहे. तर ओरियन विद्यालयातील इशान लोंढे या विद्यार्थ्यांने आयसीएसई बोर्डाच्या परीक्षेत ९९.४०% गुण संपादित करून संपूर्ण पार्ल्यात चौथ्या क्रमांकाचे स्थान मिळवले आहे. तर पार्ले टिळक विद्यालयाच्या ऋतुराज देशपांडे या विद्यार्थ्यांने आयसीएसई बोर्डाच्या परीक्षेत ९९.२०% गुण संपादित करून संपूर्ण पार्ल्यात पाचवा क्रमांक मिळवला आहे. समस्त पार्लेकरांतर्फे दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन.



## संपादकीय

मागील महिन्यात १०वी चा रिझल्ट लागला आणि अपेक्षेप्रमाणे पार्ल्याच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. फक्त पार्ले टिळक आणि महिला संघ या नामवंत शाळांतीलच नव्हे तर इतर शाळांतील मुलांनी सुद्धा चांगले मार्क मिळवले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन.

मुलाचे दहावीचे वर्ष म्हटले कि घरातले वातावरणच बदलून जाते. इतके तास अभ्यास, अनेक क्लासेस, इतके तासच झोप, हेच खायचे, खेळाचे, सिनेमाचे, पिकनिकचे नाव सुद्धा काढायचे नाही, अशी अघोषित आणीबाणी घरात सुरु होते. वर्षभर ह्या जात्यात मूल इतके पिसून निघते कि बोर्डाच्या परीक्षेची वेळ येईपर्यंत त्याचा उत्साह, उमेद, सर्व काही संपते. मनात गोंधळ उडतो, अनेक मुले ह्या अवास्तव दबावामुळे आत्मविश्वास गमावतात, निराशाग्रस्त होतात, खचून जातात. इच्छेविरुद्ध दिलेल्या परीक्षेचा निकाल अपेक्षेप्रमाणेच लागतो आणि आपण सर्व मिळून एक आत्मविश्वास गमावलेला, संपूर्णपणे हरलेला युवक तयार करतो. हो, यात आपला सर्वांचा दोष आहे, पालक, शिक्षक, नातेवाईक, मित्रमंडळ, सर्व मिळून असे वातावरण तयार करतात कि दहावीची परीक्षा म्हणजे जीवन मरणाचा प्रश्न आहे. त्यात यशस्वी झाला नाहीत तर तुम्हाला आयुष्यात काहीच करता येणार नाही. ह्या अमानवी, क्रूर प्रघातामुळे अनेक मुले उमलायच्या आधीच कोमेजून जातात याचे भान सुद्धा आपल्याला राहात नाही.

खरंच, किती महत्व आहे दहावीच्या परीक्षेला ? पालकांनी मुलाची आवड ओळखावी, त्याला कुठले विषय समजतात ? कुठले जड जातात ? ह्याची पारख करावी. मुलाला कशात रस आहे ? अभ्यासाच्या कुठल्या शाखेत तो रमेल ? ह्याचा विचार करावा. त्याला खेळात, चित्रकलेत, संगीतात रस असेल तर मेडिकल, इंजिनीरिंग, आर्किटेक्चर च्या नादाला न लागता त्याच्या आवडीला अनुसरून पर्याय शोधावा. आपली स्वप्ने आपल्या मुलांवर लादू नयेत. ह्याच चूका अनेक पालक करतात व शेवटी पस्तावतात.

'अपयश ही यशाची पहिली पायरी असते' ही म्हण आपण सर्व लहानपणापासून ऐकत आलो आहोत पण आता इतक्या वर्षानंतर, आयुष्यातील अनेक चढउतार अनुभवल्यावर त्या म्हणीतील सत्यता शंभर टक्के पटते. मुलांनो, जरी दहावीत अपेक्षेप्रमाणे मार्क मिळाले नाहीत, अपयश आले तरी गांगरून जाऊ नका, निराश होऊ नका. अजून आपल्याला भरपूर संधी आहेत, अनेक मार्ग आहेत. यश किती वेळा हुलकावणी देईल ? आपण मैदान सोडायचे नाही. आयुष्याच्या खेळाला आता तर कुठे सुरवात होतेये, खरे ना !

पार्लेकर
संपादक
ज्ञानेश चांदेकर
संपादकीय सहाय्य
तानिया गायकवाड
editorial@parlekar.com
जाहिरात व्यवस्थापन
भावेश शिंदे
marketing@parlekar.com
सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स
निर्मिती
अनिता चांदेकर
www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्का, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# आदर्श आर्किटेक्ट

लहान मुलं अनेक गोष्टी बघून निरनिराळे प्रश्न विचारतात. त्याचे सुयोग्य उत्तरे देऊन त्यांची जिज्ञासा शमवली पाहिजे असे आजकाल काही मानसशास्त्र म्हणतात. पण ज्या काळात यावर फार भाष्य होत नव्हते तेव्हाही वेगवेगळ्या इमारती बघून विलेपार्लेतील एका लहान मुलाच्या मनात असंख्य प्रश्न उभे राहत. ही इमारत कोणी बांधली ? का बांधली ? पण महत्त्वाचा भाग असा की त्याचे वडील त्याच्या प्रश्नांना समर्पक उत्तरच द्यायचे असे नाही तर अशा चौकस पणाला उत्तेजनही द्यायचे. त्यामुळेच लहान वयातच इमारत, घर यांच्याकडे एका वेगळ्या दृष्टीने



बघण्याची या मुलाला सवय लागली आणि त्यांच्या मोठेपणी या मुलाने आर्किटेक तथा वास्तुविशारद व्हायचे ठरवले. ही गोष्ट आहे विलेपार्ल्यातीलच नव्हे तर मुंबईतील नामवंतांत गणना होणारे सुप्रसिद्ध वास्तु विशारद श्री. प्रवीण कणेकर यांची.

पार्ले टिळक शाळेत मॅट्रिक पर्यंत शिक्षण झाल्यावर श्री. प्रवीण यांनी बांद्रा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर मधून आर्किटेकची पदवी घेतली. शिक्षण घेत असतानाच अनुभव मिळवण्यासाठी ते इतर वास्तुशारदांकडे काम करत होते. त्यामुळेच पदवी मिळताच त्यांनी लहान मोठी इंटिरियर व आर्किटेक्चरची कामे घेण्यास सुरुवात केली. आपण नोकरी न करता व्यवसायास करायचा यावरती ते इतके अडीग होते की त्यांनी इतर कोणताही विचारच केला नाही. त्यात त्यांना वडिलांचीही भक्कम साथ मिळाली.

एकदा काम करायचे ठरवल्यावर ते पूर्णपणे झोकून देऊन चिकाटीने करणे हा प्रवीण यांचा स्वभाव. पहिल्यापासूनच कामाच्या बाबतीत त्यांनी कोणत्याही सीमारेषा आखून घेतल्या नाहीत. त्यामुळेच ते फक्त पार्ल्यासाठी काम करत राहिले नाहीत. अंधेरी पश्चिम, पूर्व, पार्ले, बोरीवली, नाशिक, नवी मुंबई असे कोणतेही ठिकाण असो, इमारत, हॉस्पिटल ,कार्यालय, रिसॉर्ट, सामाजिक संस्था, फार्मा, स्कूल आदी कोणताही प्रकार त्यांनी साकारायचे सोडलेले नाही. इमारतींच्या पुनर्विकासात त्यांचा हातखंड असल्याने बोरीवलीतील ओम मलईगिरी, गंगाधर, श्रीकृष्ण नगर आदी सोसायटी तर विलेपार्लेतील रजत धवलगिरी, महंत को. ऑ., सिमरन,सह्याद्री आणि इतर अनेक सोसायटीचे डिझायनिंग त्यांनी केले आहे. तर तृप्ती, ऋद्धीसिद्धी यांचे काम चालू आहे. पण प्रवीण यांच्या नावाजलेल्या कामांमध्ये खारघर येथील टाटा मेमोरियल सेंटरच्या कॅन्सर ग्रस्त रुग्णांसाठी प्रोटॉन थेरपीचे अद्ययावत हॉस्पिटल, परेल येथील डॉक्टर्स साठीच्या क्वार्टर्स व पेशंटसाठी धर्मशाळा उभारणीचे कामही आहे. केमिकल व फार्म उद्योगात मायक्रो लॅब (मुंबई), लिवा (वडोदरा), मोरया (अहमदाबाद) आदी नावे येतात. मुंबई डिस्ट्रिक्ट एड्स कंट्रोल सोसायटी (MDACS), तसेच (BSES) आदी संस्थांसाठी विस्तृत कामात श्री. कणेकर गेल्या ४८ वर्षातील कार्य कर्तुत्वाचे साक्षीदार आहेत.

प्रवीण यांच्या शब्दात सांगायचे तर स्वत:च्या राहत्या घराच्या साडेतीनशे ते साडेतीन हजार चौरस फूट अशा चढ्या भाजणीतील प्रवासाची ही कहाणी आहे. विलेपार्ले वेस्ट मधील केबिन स्पेस नंतर पार्ल्यातील दयाळाश्रम बिल्डिंग, वैखरी सोसायटी व आजचे सिमरन सोसायटीतील सुसज्ज कार्यालय. तसेच पार्ल्यातील श्री स्वामी कृपा येथील राहत्या घरासाठी असलेले आलिशान पेंट हाऊस त्यांच्या प्रगतीची पदचिन्हे आहेत.

ह्या सर्व व्यावसायिक कष्टार्जित यशात त्यांनी फार मोठे सन्मानही मिळवले आहेत. प्रवीणजी दिल्ली स्थित मेंबर ऑफ कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरचे सदस्य आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चरचे फेलो मेंबर आहेत. रजिस्टर व्हॅल्यूअर म्हणून काम करताना त्यांच्या सेवेचा लाभ घेणाऱ्यांना सर्व प्रकारच्या सेवा एकाच छताखाली मिळतात. हा मोठा फायदा आहे. १९८२ मध्ये प्रवीणजींनी PEATA ( प्रॅक्टिसिंग इंजिनियर्स आर्किटेक्चर अँड टाऊन प्लॅनर्स असोसिएशन) चे सभासदत्व घेतले. तेथील वेगवेगळ्या उपक्रमात भाग घेत २०१०-१२ या दोन वर्षांसाठी ते या संघटनेचे अध्यक्ष झाले. व्यावसायिकांच्या या संघटनेचे ते सर्वोच्च सन्मानाचे प्रतीक आहे. केंद्र, राज्य व त्याच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांच्या विकास कामात या संघटनेचा सल्ला घेतला जातो. या संघटनेच्या सुवर्ण महोत्सवाचे प्रवीण हे मुख्य निमंत्रक होते. अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत त्यांनी बदलत्या काळानुसार व नवीन धोरणे व नियमांस अनुसरून अनेक नव्या संकल्पना व कार्यक्रम केले. PEATA चे अध्यक्ष म्हणून राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांना भेटण्याचे भाग्य देखील त्यांना लाभले.

याचवेळी पार्ले टिळक च्या संस्कारांनी त्यांना समाजभानही दिले आहे. पार्ले टिळक शाळा व लोकमान्य सेवा संघ यावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. त्यामुळेच लोकमान्य सेवा संघाचे काही वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेले पुल गौरव दालन, जांभुळपाड्यातील आनंद धाम वृद्धाश्रमाचे तसेच नाडकर्णी बालकल्याण केंद्राचे काम त्यांनी सेवा धर्मातून निशुल्क करून दिले आहे.

प्रवीण यांनी कष्टाने, बुद्धिमत्तेने व व्यावसायिक कौशल्याने उभारलेला हा यशाचा डोलारा सांभाळण्यासाठी व विस्तारण्यासाठी त्यांना तेवढेच खंदे वारसदार मिळाले हे अहोभाग्य. त्यांचे पुत्र श्री अमित कणेकर हे कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट इंजिनिअरिंग यात पदवी घेऊन वडिलांच्या व्यवसायात सामील झाले व नवनव्या संकल्पना घेऊन व्यवसायाचा भार स्वत:च्या खांद्यावर त्यांनी घेतला आहे. अभिनव कल्पना, आश्चर्यकारक बांधकाम संकल्पना यांसाठी त्यांची वाहवा होत असते. स्नुषा सौ.वृषाली एमबीए फायनान्स असून स्वतंत्र व्यवसाय करते आहे. प्रवीण यांची कन्या सौ.अनुजा बेहेरे प्रवीण यांचा वारसा चालवत आर्किटेक्ट झाली आहे . ती पुण्यात स्वत:चा व्यवसाय सांभाळत असून बेहेरे-राठी बिल्डर्स या आपल्या सासरच्या उद्योगातही कार्यरत आहे.

स्वत:च्या कामात व कुटुंबात संतृप्त असलेले प्रवीण आजही स्वत:च्या ४८ वर्षांच्या

पान ४ वर



# रंगुनी रागांत साऱ्या

## दरबारी कानडा

ह्या रागाची ओळख तशी थोडी उशीराच झाली. स्वत: वेगळे राहायला लागल्यावर एखादी उंची वाईनची बाटली घरी मित्राबरोबर उघडली आणि एखादी गुलाम अली ची गझल लावली कि जी मजा येते ना अगदी तशीच फीलिंग. त्यात ती 'हंगामा है क्यूँ बरपा ? थोडीसी जो पिली है' एकदम फेव्हरेट. ही गझल म्हणजे मनसोक्त जिण्याचे स्वातंत्र्य जणू . यात पिण्याला नसून जिण्याला महत्व जास्त आहे. आधीच गुलाम अलींचा आवाज, असले काव्यं आणि तो मूड एकदम भारी. नंतर कळलं कि हा राग म्हणजे 'दरबारी कानडा'. नंतर या रागाबद्दल खूप आवड निर्माण झाली. काही तज्ञांच्या मते थोडे मिश्र असले तरी माझ्यासाठी हेच या रागाचे लक्षणगीत.

असं म्हणतात कि हा कर्नाटकी राग तानसेन यांनी हिंदुस्थानी संगीतात आणला आणि त्याचे नामकरण केले. हा राग नावाप्रमाणे दरबारात गायला जाणारा म्हणून अजिबात उच्छंखल नाही. अतिशय गंभीर पण गेय, नैसर्गिक गोड असल्यामुळे खूप लोकप्रिय. थोडी अभिजात संगीतात गोडी निर्माण झालेला रसिक भीमसेनजीनी या रागात गायलेले 'जनक जनकवा मोरे' हे द्रुत ऐकून मंत्रमुग्ध होणारच. प्रत्येक घराण्याचा गायक 'दरबारी कानडा' आपल्या परंपरेनुसार गातो पण रागाची खुमारी त्याच्या गंभीर रसाने ठळकपणे समोर येतेच. या रागात खूप चीजा प्रसिद्ध आहेत पण चित्रपट सृष्टी ने या रागावर खरचं खूप भरोसा ठेवला आहे. प्रत्येक संगीतकार या रागाचे एक निराळे रूप आपल्यासमोर आणतो. एकच राग त्याच्या असंख्य रूपात आपल्या समोर येतो, इतका कि संभ्रम व्हावा.

मदन मोहन हा स्वर्गीय अवलिया. त्याचे रफीच्या आवाजातील 'मै निगाहे तेरे चेहरेसे हटाऊ कैसे ?'आठवा. चित्रपट आपकी परछाईया अत्यंत रोमँटिक. त्याच चित्रपटातील लता मंगेशकरांचे 'अगर मुझसे मोहोब्बत है, मुझे सब अपने गम दे दो' याच रागातील. दोन्ही गाणी अप्रतिम, तलम रेशमी भावना.

याच बरोबर दु:ख, विरह, प्रेमभंग वगैरे. पूर्वीच मुकेश यांचं 'दिल जलता है तो जलने दे', 'चांदिकी दिवार ना तोडी प्यार भरा दिल तोड दिया'. किंवा रफीचं 'गुजरे है आज इष्क में हम उस मकाम सेसे' आणि 'हम तुमसे जुदा होके', 'ओ दुनियाके रखवाले', 'रहा गर्दीशो मे हरदम' एकदम दु:खी, विरही वगैरे.

या पेक्षा एकदम वेगळी गाणी म्हणजे नमकहलाल मधले 'पग घुंगरू बांध मीरा नाची थी', आणि कल्ट सॉंग 'सत्यम शिवम सुंदरम'. त्यात झीनत जास्त लक्षात रहाते यात त्या रागाचा दोष नाही.

नाट्यसंगीतात छान वापरला गेला हा राग. 'मृगनयना रसिक मोहिनी', 'रजनीनाथ हा नभी उगवला' वगैरे.

एक गाणे मात्र माझ्या पूर्ण डोक्यात जाते. ते याच रागात आहे हे अजून पटत नाही. 'देखा है पेहली बार साजन कि आंखो में प्यार'.या गाण्यानी त्या काळी खूप लोकांचा लोकलचा प्रवास दोन वर्ष टॉर्चर केला. मी गंमतीने याला ठिक्कर गाणे म्हणत असे. दोन पत्र्याचे, किंवा तुटक्या काचांचे तुकडे घेऊन कोणीही भीक मागताना त्या काळी हेच गाण गायचा /ची. गायला सोपे आणि लोकप्रिय असं कॉम्बिनेशन होत ते.

अरे कुठे ते हंगामा है क्यूँ आणि कुठे हा तमाशा ? असो.



मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८

## लता गुठे यांची राज्यस्तरीय बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड

गेली वीस वर्षे साहित्यिका, संपादिका, प्रकाशिका, बाल साहित्यिक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर महाराष्ट्राबाहेरही परिचित असणाऱ्या लता गुठे यांची शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन (मुक्ताईनगर) संस्थेच्या वतीने खामगाव येथे २६ ऑगस्ट २०२३ रोजी भरवण्यात येणाऱ्या दुसऱ्या राज्यस्तरीय बाल, किशोर व युवा मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. लता गुठे यांनी भरारी प्रकाशनच्या माध्यमातून २०० पेक्षा जास्त पुस्तकांची निर्मिती केली आहे. त्याचबरोबर गेली बारा वर्षे 'धमाल मस्ती' व 'तार्‍यांचे जग' या दोन दिवाळी अंकांचे प्रकाशन व संपादन करत आहेत.



विविध महत्त्वाच्या संस्थांच्या एकूण ४८ राज्यस्तरीय पुरस्काराच्या त्या मानकरी आहेत . कोकण मराठी साहित्य परिषदेच्या मुंबई जिल्हा अध्यक्ष तसेच मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय विलेपार्ले शाखा कार्यवाह म्हणून कार्यरत आहेत.



# विलेपार्ले ते उझबेकिस्तान- एक विलक्षण प्रवास

रश्मिनीला लहानपणापासूनच भाषा, इतिहास आणि वाचनाची आवड. शाळेत असताना ती वक्तृत्व स्पर्धेत, सामाजिक चर्चेत भाग घेऊ लागली होती. घरात टीव्हीवर पार्लमेंटरी डिबेट्स लागत त्याबद्दलही रश्मिनीला कुतुहल वाटायचं. आठवीत येईपर्यंत आपण आर्ट्सला जायचं हे रश्मिनीनं ठरवून टाकलं असलं तरी पुढे दहावीत भरपूर गुण मिळवूनही तो निश्चय कायम ठेवला हे विशेषच !

बीएसाठी रश्मिनी राज्यशास्त्र घेऊन रूपारेल कॉलेजला गेली. आईनं म्हटलं ''कुठलाही विषय घे पण पार्ल्याबाहेरच्या कॉलेजात जा. ट्रेनचा पासही सेकंड क्लासचाच काढायचा.''



त्यामुळे पुढील आयुष्यात ती बाहेरच्या मोठ्या जगात गेली त्याची तिथे नांदीच झाली असं म्हणायला हरकत नाही.

राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. अविनाश कोल्हे यांनी रश्मिनी मधील गुणवत्ता हेरून ती बीएच्या दुसर्या वर्षाला असतानाच सांगितलं की ''करीयर करायच असेल तर जेएनयू विद्यापीठात जा. तिथे शास्त्रशुद्ध ज्ञान, उत्तम लायब्ररी, एकुणच एक्स्पोझर चांगलं मिळेल. ह्युमन सायन्सेस (मानव-संबंधित शास्त्रांमध्ये) ते सर्वोत्तम आहे''. मग रश्मिनीने बीएसोबत जेएनयूच्या प्रवेशपरीक्षेचाही जोरदार अभ्यास केला आणि २००७ साली तिला जेएनयूमध्ये प्रवेश मिळाला. तिथे तिने एमएसाठी 'ईंटरनॅशनल रिलेशन्स' हा विषय घेतला.

त्या वर्षी महाराष्ट्रातून तिथं गेलेली ती एकमेव उमेदवार होती. तिथलं अवाढव्य कॅंपस पाहून ती थक्कच झाली. जेएनयूत जाणं म्हणजे छोट्या तळ्यातून महासागरात जाणं. वर्गातल्या ९० मुलांपैकी सात परदेशी होते, तर उरलेली भारतातल्या राज्यांतून आलेली होती. तिथे गेल्यावर शैक्षणिक-सांस्कृतिक धक्केही बरेच बसले तरी त्यामुळेच 'आपलं क्षितिज विस्तारतं, पूर्वग्रह गळून पडतात आणि सगळीकडे आपल्यासारखीच माणसं असतात' हा अनुभव तिला आला. ती इफ्तार पार्टीला गेली तशीच दुर्गापूजेलाही गेली.




जेएनयूमध्ये भेट द्यायला विविध देशांचे राजदूत आणि राजकीय नेते यायचे, त्या राजकीय आणि शैक्षणिक भाषणांचा व्यक्तिमत्व घडण्याच्या दृष्टीने फार उपयोग झाला.

एमएनंतर रश्मिनीने जेएनयूच्या रशिया आणि



मध्य आशियाई अभ्यास केंद्रातून पीएचडी केली आणि 'स्वतंत्र उझबेकिस्तानातील राष्ट्रनिर्माण प्रक्रिया' या विषयावर प्रबंध लिहिला. त्यासाठी ती काही काळ उझबेकिस्तानला अभ्यासासाठी गेली होती. तिथल्या लोकांना भारताविषयी फार प्रेम आहे. ८७ टक्के लोकसंख्या सुन्नी मुस्लिम असूनही देश धर्मनिरपेक्ष आहे.

पीएचडीनंतर रश्मिनीने चार वर्षे दिल्लीतील 'थिंक टॅंक' मध्ये काम केलं. सध्या ती जेएनयूमध्ये 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयात सहप्राध्यापिका आहे. या विषयातली तज्ज्ञ म्हणून आंतरराष्ट्रीय परिषदांना तिला मानाचे बोलावणे असते, आंतरराष्ट्रीय मासिकांत तिचे लेखही प्रकाशित होत असतात. तरुण वयात मिळवलेल्या या यशातील उल्लेखनीय प्रसंग म्हणजे २०१५ साली रशियातल्या ब्रिक्स युवा परिषदेसाठीच्या भारतीय प्रतिनिधी मंडळात तिचा समावेश होता. २०१८ साली वॉशिंग्टन येथील 'नॅशनल डिफेन्स युनिव्हर्सिटी' मधील 'सिल्क रोडचे भावी नेतृत्व' या संमेलनात तिने भारताचं प्रतिनिधित्व केलं. तसंच येत्या ९ जुलै, २०२३ रोजी उझबेकिस्तानात होणार्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी आंतरराष्ट्रीय निरीक्षक म्हणून तिला आमंत्रण आलेलं आहे.

आपल्या या अभ्यास-प्रवासात आई-वडील नीलम आणि अनिल कोपरकर तसेच पती अभिषेक चौधरी यांची खूप मोलाची साथ मिळाली, कन्या अहिल्या हिने आपल्या जीवनास परिपूर्णता दिली असे ती नम्रपणे नमूद करते.

खरोखरच, पार्ल्यातल्या या मुलीने क्षितिजाला गवसणी घातली हेच म्हणावं लागतं.



**सविता दामले**
**९९३०३ ११५४६**

# अनुमित मुंबईच्या विलेपार्ले येथील नाट्य शिबीराचा वृत्तांत

अनुमित मुंबई ही संस्था अनुजा सोमण - तांबे आणि सुमित तांबे ह्या दांपत्याने २०२१ साली सुरु केली. चित्रपट लेखक असणारा सुमित आणि संगीतात एम.ए. असणारी अनुजा ह्यांनी नाटक, संगीत आणि सिनेमा ह्या क्षेत्रात सर्वोत्तम कलाकृती तयार कराव्यात आणि त्यासाठी लागणारे कलाकार तयार व्हावेत ह्या ध्येयासह संस्थेचे कार्य सुरु केले. आज अनुमित मुंबई अभिनय शिबीरे, चित्रपटांचे स्क्रिनिंग्स आणि नाटकांची निर्मिती ह्यातून त्यांचे कार्य पुढे नेत आहेत.

अनुमित मुंबईकडूनच दिनांक २५ मे, २०२३ ते ४ जून, २०२३ ह्या कालावधीत विलेपार्ले पूर्व येथे नाट्य शिबिराचे आयोजन केले गेले होते. आठ ते पंधरा ह्या वयोगटासाठीच्या ह्या शिबीराला पार्लेकरांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. १० दिवस चाललेल्या ह्या शिबीरात पार्लेच नव्हे तर अंधेरी, मालाड, जोगेश्वरी इतकंच काय तर मीरा रोड ह्या उपनगरांमधून सुद्धा विद्यार्थी सहभागी झाले. शिबीरात मुलांना भाषा आणि उच्चार, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत, वेशभूषा, रंगभूषा ह्या सारख्या सगळ्या नाट्यांगांची माहिती देण्यात आली आणि त्याची प्रात्यक्षिकेदेखील करून घेण्यात आली. तेजपाल स्कीममधील श्री साधना सोसायटीच्या सभागृहात रंगलेल्या ह्या बाळमेळ्यात मुलं जणू अनुमित मुंबईच्या कुटुंबाचाच भाग होऊन गेली होती. दहा दिवसांचं शिबीर आणि अकराव्या दिवशी नाट्यप्रयोग अशी ह्या शिबिराची रूपरेषा होती. त्यामुळे १० दिवस मुलं नाटकाचे विविध आयाम शिकत असतानाच एका खऱ्याखुऱ्या नाट्यप्रयोगाची तयारी पण करीत होती. सुमित आणि अनुजासोबतच अनुमित मुंबईची संपूर्ण टीम मुलांना हसत खेळत, मजा करत ही सगळी नाट्यवारी करण्यासाठी मेहनत घेत होती. अकराव्या दिवशी होणाऱ्या नाट्यप्रयोगांमधून मुलांना खऱ्याखुऱ्या नाट्याचा अनुभव व्हावा म्हणून अनुमित मुंबईकडून प्रभादेवी येथील रविंद्र नाट्यगृहाचे मिनी थिएटर बुक केले गेले.

दिनांक ४ जून, २०२३ रोजी ह्या शिबीराचा सांगता सोहळा रविंद्र नाट्यगृहाच्या सभागृहात रंगला. पालक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत रंगलेल्या ह्या कार्यक्रमात मुलांनी तीन छोटे नाट्यप्रयोग सादर केले. मुलांच्या वयाला साजेसे आणि त्यांच्या दररोजच्या आयुष्यातले विषय निवडून ह्यातल्या नाट्यप्रयोगांची निर्मिती केली गेली होती. अनुमित मुंबईच्या परंपरेनुसार तिसरी घंटा देऊन आणि त्यानंतर नांदी गाऊन कार्यक्रमाला सुरुवात झाली आणि अंगावर विविध रंगांची उधळण घेत छोट्या रंगकर्मींनी आपली कलाकृती सादर करायला सुरुवात केली. मुलं इतकं सुंदर काम करत होती की पालकांच्या आणि आलेल्या पाहुण्यांच्या टाळ्या आणि कौतुकोद्गार काही थांबत नव्हते. तिन्ही नाट्यप्रयोगात आपली मुलं कशी छान, मन लावून एखाद्या सरावलेल्या कलाकारासारखं कामं करतायेत ह्या विचाराने पालकांचा आनंद द्विगुणित झाला होता. नाट्यप्रयोगानंतर मुलांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यानंतर मुलांनी सुंदर नृत्याविष्कार सादर केले. मग पालक, मुलं आणि मान्यवरांनी त्यांची मनोगतं व्यक्त केली आणि पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

मराठी नाट्यक्षेत्र अत्यंत प्रयोगशील आहे. अशा प्रयोगशील रंगभूमीवर जाणारे कलाकार हे कलात्मकदृष्ट्या आणि तांत्रिकदृष्ट्या प्रशिक्षित असावेत ह्यासाठी अनुमित मुंबई प्रयत्नशील आहे. ह्यासाठी विलेपार्ले येथे स्वातंत्र्यवीर सावरकर केंद्र इथे त्यांचे वार्षिक शिबीर सुद्धा सुरु आहे, जिथे शिबिरार्थींना अभिनय आणि तंत्र ह्यामध्ये प्रशिक्षण देऊन "कंप्लिटली स्टेज रेडी" करावं हा अनुमित मुंबईचा मानस आहे. नुकत्याच डोंबिवली येथे पार पडलेल्या अनुमित मुंबईच्या शिबिराला पालक आणि विद्यार्थ्यांचा असाच भरभरून प्रतिसाद मिळाला होता. तेथील पालक आणि अनेक नागरिक तिथे अनुमित मुंबईने पूर्णवेळ अभिनय प्रशिक्षण केंद्र सुरु करावे यासाठी प्रयत्न करीत आहेत.

अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केलेल्या 'समायरा' ह्या चित्रपटाचा लेखक सुमित तांबे आणि त्याची पत्नी अनुजा जी एक उत्तम गायिका आहे, अनुमित मुंबईच्या माध्यमातून उत्तम कलाकार, दर्दी प्रेक्षक आणि कसलेले तंत्रज्ञ बनविण्यासाठी पूर्ण प्रयत्न करीत आहेत. विविध वयोगटाच्या लोकांची अभिनय शिबिरे, फिल्म अप्रेसिएशन आणि इतर सर्व गोष्टींसाठी त्यांना जरूर संपर्क साधा.



**सुमित तांबे** - ८४५२९४६५५४
**अनुमित मुंबई** - ९९८७८७६५५४

ॲडव्हेटोरीयल

पान २ वरून

## आदर्श आर्किटेक्ट

व्यावसायिक अनुभवाची शिदोरी विद्यार्थ्यांत वाटत असतात. या सर्वात त्यांना भरघोस साथ मिळाली ती पत्नी सौ. भारती यांची ज्यांनी एकहाती घर सांभाळले. पार्ल्याला स्वत:चे घर समजणाऱ्या प्रवीण हे मुंबईत व इतरत्र बांधले जाणारे टोले जंग मनोरे, भूमीवरील अतिरिक्त भाराची समस्या अस्वस्थ करते. पण टाळता न येणारी त्यातील हतबलताही त्यांच्या बोलण्यात येते. जास्त कार्पेट एरिया मिळवण्याच्या रसीखेचीमुळे निर्माण होणाऱ्या बांधकाम समस्या, पीएमसी या पदाचे होत चाललेले अवमूल्यन त्यांना काळजी करणारे वाटते. यात फ्लॅट धारक, बांधकाम व्यवसायिक व पीएमसी सर्वानीच समजुतीने व विचारपूर्वक निर्णय घेण्याची निकड ते बोलून दाखवतात. 'आम्ही पार्लेकर' ने आयोजित केलेल्या आजवरच्या पुनर्विकास परिषदांमध्येही त्यांनी दिलेले योगदान व पार्लेकरांना केलेले मार्गदर्शन विसरता येणार नाही.

प्रवीण यांना आपल्या यशाचा आलेख असाच उत्तरोत्तर वाढत जावो व पार्ल्यातील तरुणांना आपल्यापासून स्फूर्ती मिळो याच सदिच्छा.



**संगीता बेहेरे**
**९८६७७५८३१०**

# पार्ल्यातील वृक्षवैविध्य

## वटवृक्ष



**वटवृक्ष हा आपल्या चांगलाच परिचयाचा.**

वनस्पतीशास्त्रानुसार त्याचे कुळ (Family) Moraceae व नांव Ficus benghalansis. ह्याला लाल रंगाची फळं येतात. ह्याच्या अनेक उप-जातींपैकी तसा तुरळक आढळणारा एक प्रकार आहे. त्याचे नांव आहे Ficus drupacea variety pubescens. हा म्हैसूर-वड म्हणून देखील ओळखला जातो. ह्याचं वैशिष्ट्य म्हणजे ह्याला येणारी पिवळट शेंदरी रंगाची अंगावर मऊ लव असणारी फळं. आपल्या पार्ल्यात हा वड आहे. हनूमानरस्त्यावरून दक्षिणेस रामभाऊबर्वे मार्गावरून नेहरू रस्त्याकडे जाताना डाव्या बाजूला पार्ले टिळक असोसिएशनचे मैदान लागते. ते संपल्यावर डावीकडे शिवानंद सहनिवासाकडे जाणारा चित्रकार केतकर मार्ग आहे. त्याच कोपऱ्यावर हा वड उभा आहे. त्याच्या पिवळट भगव्या फळांमुळे हा सहज ओळखता येतो.

ह्याचं अजून एक वैशिष्ट्य म्हणजे ह्याला पारंब्या फुटलेल्या दिसत नाहीत. (नाही म्हणावे तर एकच लहानशी पारंबी पाच एक फूट उंचीवरील बेचक्यात दिसते तेवढीच) ह्याची फळं वटवाघळे, खारी, कावळे व इतर पक्षी आवडीने खातात.



**श्रीकांत सावरकर**
९२२३३१४९०९

# विश्वास महाशब्दे यांनी चितारलेल्या गोपीनाथ सावकार यांच्या तैलचित्राचे अनावरण

मराठी नाट्य व्यावसायिक निर्माता संघाचा (अ. भा. नाट्यपरिषद संलग्न) ५४ वा वर्धापनदिनानिमित्त श्री शिवाजी मंदिर येथे गुरूवार दिनांक २२ जून २०२३ रोजी 'नाट्य मल्हार' हा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात श्री गोपीनाथ सावकार स्मृती विश्वस्त निधीच्या सहयोगानं ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक - निर्माते गोपिनाथ सावकार यांच्या तैलचित्राचं अनावरण त्यांचे भाचे म्हणजेच ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या हस्ते करण्यात आले. सावकार यांचे तैलचित्र पार्ल्यातील चित्रकार विश्वास महाशब्दे यांनी चितारले आहे. त्याचबरोबर गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या तसबिरीचे देखील अनावरण करण्यात आले.

या कार्यक्रमाला जेष्ठ अभिनेते अशोक सराफ, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर यांच्या सोबतच मंत्री उदय सामंत, नाटककार प्रेमानंद गज्वी, अभिनेते आणि नाट्यपरिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले आदी मान्यवरांची उपस्थिती होती.











# ‘दणकट दंड स्नायू जैसे’

शालेय जीवनात म्हणा किंवा एकंदरीत जनसामांन्यात म्हणा कविता म्हटली की तिच्या बद्दल काही साधारण अपेक्षा डोळ्यांसमोर येतात. निसर्ग वर्णन, प्रेमकहाणी, कवीच्या हळव्या मनाची तगमग, समाजाला संदेश, राष्ट्रभक्ती, विनोद, विडंबन इत्यादी इत्यादी आणि मग त्या विषयानुसार येणारी कवीची प्रतिभाशाली शब्द रचना, कल्पनाविलास, उपमा, उत्प्रेक्षा, यमक व इतर अलंकार एक ना दोन. शाळेत हे सर्व आम्ही आपापल्या कुवती नुसार अनुभवलं. पण एक कविता शिकताना गंम्मतच झाली. त्या कवितेचीच ही गोष्ट.

त्याच असं होतं की आमच्या मराठीच्या शिक्षिका, जी कविता शिकायची असेल ती आम्हांला आदल्या दिवशी वाचून यायला सांगायच्या. मी ती वाचुनच नव्हे तर चक्क पाठ करूनच यायचो. (कविता पाठ करण्याची माझी ही सवय अशी जुनी, शाळेपासूनची). पण बरेच जण आळसच करायचे. कारण आमचा वर्ग हा घासू व सो कॉल्ड हुशार मुलांचा वर्ग. स्पेशल ऍरिथमॅटिक्स, हायर मॅथ्स असे मला अगम्य असलेले विषय निवडणारा. मराठी हा काही स्कोअरिंग विषय नाही मग एव्हडा त्रास का घ्या अश्या मानसिकतेचा. माझा एक खास मित्र तर मराठी च्या तासाला चक्क त्याच्या नेहमीच्या पहिल्या बाकावरून सगळ्यात मागच्या बाकावर सटकायचा...झोपा काढायला. नंतर घासू मित्रांच्या नोट्स आंबट चेहऱ्याने उतरवून घायचा. काव्य, कवी कल्पना वगैरे सगळं त्याच्या डोक्यावरून जायचं.

पण एक दिवस पाहतो तर काय महाशय मराठीच्या तासाला पहिल्या बाकावर. मी विचारलं,

“काय रे, बरा आहेस ना?”

“हो. का?”

“कारण आत्ता मराठीचा तास आहे.”

“माहिती आहे.”

“अरे, कविता शिकवणार आहेत बाई.”

तशी त्याचे डोळे चमकले. त्यानं विचारलं,

“ए, तू वाचलीस ती कविता? मी वाचली.”

“का छछछ य?” मी उडालोच.

“तू चक्क कविता वाचून आलायस आज?”

तो थोडा गोरमोरा झाला. म्हणाला,

“अरे सहज म्हणून शीर्षक वाचलं, ‘दणकट दंड स्नायू जैसे’. वाटलं, अशी काय कविता असते काय? मग पूर्ण वाचली. छोटीशीच आहे पण सॉल्लिड आहे. मला जाम आवडली.”

मी पाहताच बसलो.

बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेची हीच तर गंमत आहे. “अरे, ही काय कविता आहे का” असं मनात येई पर्यंत ती तुमचं नरडं पकडते आणि तुमचं अस्तित्व गदागदा हलवते. त्यांच्या ‘पिपात ओल्या मेले उंदीर’ या अचाट कवितेने तर वर उल्लेख केलेल्या कवितांच्या सगळ्या मापदंडांचा अक्षरश: चुराडा करून टाकला होता. या बंडखोर कवीचं काव्य कोणावरूनही निष्परिणाम असं वाहून जाऊच शकतं नाही. दुसरे केशवसूत मानले जाणाऱ्या या युगप्रवर्तक कवीच्या कल्पनेची व त्याला साजेश्या चपखल बेलगाम शब्दांची छिन्नी, आपल्या अरसिक, तटस्थ, झापडबंद सभ्यतेचा दगड पार फोडून टाकते.

या कवितेतीलच शब्द पहा ना . ‘लोखंडाचे नाग’, ‘पोलादाचा चिरला साग’ या शब्दांनी माझ्या मित्राला भुरळ न घातली तरच नवल. त्यातला ‘पॉलिशलेली’ हा इंग्रजीतून बाटवून मराठीत आणलेल्या शब्दाने तर त्या काळी सर्व कविंची व टिकाकारांची झोप उडवली होती.


या एका कवितेने माझ्या अरसिक मित्रात कविता या साहित्य प्रकाराबाबत अमूलाग्र बदल घडवून आणला. काव्याची शक्ती अजून काय असू शकते? खरं तर त्या काळी जवळ जवळ सर्वच लहान मुलांचं स्वप्न हे झुक झुक अगीनगाडी गाडीचा ड्रायव्हर होणं हेच असायचं. मी तर बाहेर गावच्या गाडीत बसायच्या आधी न चुकता इंजिनच्या डब्याला भेट देऊन ती भट्टी व तो कोळसेवाला डोळे भरून बघून घेत असे आणि आता मोठ्या मुलांच्या शाळेत आल्यावर, त्याच्यावर कोणी कविता लिहिली आहे ही गोष्टच मुळी खूप अप्रूपाची. त्यातही इतकं हुबेहूब, प्रत्ययकारी शब्दचित्र की बस्स. आणि शब्दही तारुण्याच्या सीमेवर असलेल्याना साद घालणारे.

हे सगळं अर्थात एका निरागस बाळबोध पातळीवरचे. मात्र शेवटच्या दोनच ओळीत ही कविता कविवर्य मर्ढेकर एका अशा असीम उंचीवर नेऊन ठेवतात की ज्याचं नावं ते. एकतर यंत्र युगातील एका सामान्य कोळसेवाल्यावर काव्य रचणे हीच एक अदभूत गोष्ट आहे त्यात ते त्याला त्रेतायुगातील त्या महान कर्मवीराच्या पंगतीत नेऊन बसावतात ही त्यांच्या द्रष्टेपणाची खरंच कमाल आहे.

एकच खंत वाटते की हल्लीच्या तरुणांना या अलौकिक कवीची फारशी ओळख नाही. हल्लीच्या मुलांनीही ती भट्टी, ते फावडे, तो कोळसेवाला हे काहीही अनुभवलेले नाही. पण असं खात्रीने म्हणावंसं वाटतं की आजही जर मर्ढेकर असते तर त्यांनी अगदी आजच्या सॉफ्टवेअर इंजिनरच्या लॅप टॉप वर थिरकणाऱ्या बोटांवरही असच लोभस काव्य रचलं असतं.

दणकट दंडस्नायू जैसे
लोखंडाचे वळले नाग
कभिन्न काळ्या मांड्या
जैसा पोलादाचा चिरला साग
  फुरफुरणाऱ्या भट्टीपुढल्या प्रकाशात ही
  तळपे कांती
  जशी ओलसर शिसवी - नक्षी पॉलिशलेली
  चांदण्यात ती
  टणक कोळसा पवित्र्यात हा खोरुनि घेई
  फावड्यांत अन झोकून देई पहा लीलया
  तसाच भट्टीत अचूक झरकन
आणि फुरफुरे भट्टी जैसी
हले सावली- प्रकाश तैसा;
भालावरला रुमाल शुभ्र
जिरवून घेई घाम जरासा
  यंत्रयुगातील नवनृत्याचा स्थाणुभाव हा
  प्रगटे येथे
  मनोज्ञ मुद्रा शिल्पित एक संगमरवरी
  मांसामध्ये
आहा, कोळसेवाला काळा नव्या मनूतील
गिरीधर- पुतळा

बा. सी. मर्ढेकर



प्रसाद आठल्ये
९८२०६ १३४४५

BECOME A DOCTOR IN PUBLIC UNIVERSITIES, POLAND

- Coaching in English language
- Medicine, Dentistry,
- Public health and Nursing
- Intake starts in September 2023.
- Limited seats available

Admissions open for Medical Universities in Poland

We are Overseas Education Consultant

What we do

- Selection of Country Courses & Submission of Applications
- University admissions.
- Bank loan
- Visa Application
- Overseas Student accommodation.
- Test preparation coaching for IELTS. TOFEL. PTE. GRE. And GMAT.
- Forex Transfer.
- Internship programs for Australia and USA

Contact : D B Kale.
: +91 9870499953

Highgate Academy (India)

info@haindia.com
www.haindia.com

Design by

# कीर्तन कला - समाज प्रबोधनाचा उत्तम मार्ग

**नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग**
**जनी म्हणे ज्ञानदेवा, बोला अभंग ।**
**अभंग बोलता बोलता रंग कीर्तनाशी भरला।**
**प्रेमाच्यानी छंदे विठ्ठल नाचू लागला ।**

आपल्या महाराष्ट्राला थोर संत परंपरा लाभली आहे. संत नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज अशा अनेक संतानी आध्यात्माचा चांगला मार्ग दाखवला आहे. कीर्तन ही प्रथम भक्ती आणि नंतर कला आहे. येथे देवाने देवपण विसरून आणि भक्ताने भक्तपण विसरून दोघांनी कीर्तनरंगी नाचावे ही अद्वयानुभूती नामदेवांच्या कीर्तनाला लाभली होती. विठ्ठलाची आर्त भक्ती आणि भक्तीत दडलेले सगुण भाव म्हणजे 'कीर्तन' तर ज्ञानदेव म्हणतात शारदेचे लावण्यरत्नभांडार म्हणजे कीर्तन येथे वक्ता, श्रोता आत्मानंदाची अनुभूती कीर्तनातून घेतात. श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।

अर्चनं वंदनं दास्य सख्यमात्म निवेदनम्।

कीर्तन भक्ती ही नवविधा भक्तीमधील दुसरी भक्ती आहे. विविध वाद्यांच्या साथीने हरि चे अथवा परमेश्वराचे तसेच परमेश्वराच्या असीम भक्तांचे गुणवर्णनपर केलेले गायन ही कीर्तनाची प्रसिद्ध व्याख्या आहे.

गायन वादन, नर्तन अशा तिन्ही साधनेतून रंजकता वाढते. देव आणि भक्त यांना जोडणारा दुवा म्हणजे कीर्तनकार. समाजप्रबोधन करणे हा किर्तनकारांचा मुख्य उद्देश असतो. संकटावर मात करण्यासाठी ईश्वरी साधना आणि भक्ती ही आज काळाची गरज आहे. कीर्तन जास्तीत-जास्त रंगतदार होण्यासाठी गाण्यासोबत तबला आणि पेटीची उत्तम साथ मिळायला हवी. कीर्तकाराने सुद्धा नवे विचार-आचार यांची वाचनाने सांगड घालायला हवी. सुसंगत बदल करून कीर्तन केले तर नवीन पिढीला ते आकर्षित करू शकतील श्रोते सुद्धा रसिक असतील तर ते उत्तम दाद देऊन नव्या कीर्तनकाराला प्रोत्साहीत करतील.

कोणत्याही संकटावर मात करण्यासाठी ईश्वरी भक्ती करणे, कला, संस्कृती जोपासण्यासाठी युवा पिढीने कार्यरत राहून सहकार्य करावे. साक्षात्कार, चमत्कार दाखवण्यापेक्षा प्रत्यक्षात आलेल्या अनुभवांचे नवे दाखले देऊन ज्ञानार्जन करणे हा सुद्धा हेतू कीर्तनाने साध्य होऊ शकतो.

कीर्तनाचे विविध प्रकार आहेत. नारदीय कीर्तन,



वारकरी कीर्तन, रामदासी कीर्तन, राष्ट्रीय कीर्तन नवीन कीर्तनकार होण्यासाठी दादर येथे 'अखिल भारतीय कीर्तन विद्यालय' आहे. तेथे तीन वर्षाचा अभ्यासक्रम शिकविला जातो त्यानंतर 'कीर्तनालंकार' ही पदवी दिली जाते. पुणे युनिव्हर्सिटी तसेच नागपूर युनिव्हर्सिटी येथे सुध्दा कीर्तन हा विषय शिकविला जातो. पूर्वीच्या पिढीचे आदर्श गोविंदस्वामी आफळे, दत्तोपंत पटवर्धन असे अनेक जण होते. तर आताच्या पिंडीना चारूदत्त आफळे हे आदर्श आहेत.

आपल्या पार्ल्यामध्ये 'पार्ले हिंदू देवालय' येथे गणपती मंदिरात (गणेश जन्माचे) अनेक वर्षे कीर्तन सादर केले जाते. राममंदिर येथे 'रामजन्मा उत्सवानिमित्त' तर दत्त मंदिरामध्ये 'दत्त जन्म उत्सवानिमित्त आणि पार्लेश्वर येथे महाशिवरात्रीला कीर्तन सादर केले जाते.

प्रत्येक कीर्तनकाराला पूर्वी एक महिना कीर्तन सादर करण्याची संधी दिली जायची. त्यामुळे अनेक 'आख्यानं' सांगितली जायची. आपल्याकडे कै. गोखलेबुआ आपल्या रसाळ वाणीने, उत्तम गायनाने श्रोत्यांना खिळवून ठेवत असत. कै. गोखलेबुआ तबला, पेटी गायन या तिन्ही कलांमधे पारंगत होते, आपली बेस्ट मधील नोकरी सांभाळून ५० वर्षे साथ केली तर २५ वर्षे त्यांनी कीर्तनकला सादर केली. त्यांनी आपली कन्या युगंधरा वीरकर आणि जावई अविनाश परांजपे यांच्याकडे कीर्तनाचा वसा देऊन ठेवला आहे. पूर्वी उत्सवाच्या कीर्तनाला पुरुष कीर्तनकारच हवा असा आग्रह असायचा पण आता संचालक मंडळ बदलले. आता स्त्री - पुरुष असा भेदभाव नाही. ज्याची निवड होईल तो उत्सव कीर्तन करील. पेटीवादन करणारे सोहनी काका म्हणायचे ''पार्ल्यातील प्रेक्षक (श्रोते) अगदी चोखंदळ अभ्यासूवृत्तीचे आहेत. छान तयारीनेच कीर्तन करायला हवे.'' म्हणूनच श्रोता, वक्ता 'श्री राम समर्थ' म्हणतात.

राजाभाऊ शेंबेकर उत्तम गायक, पट्टीचे तबला आणि पेटीवादन करणारे म्हणतात ''कीर्तन हा सुध्दा नाटकासारखा प्रयोग असतो. आज छान आवाज लागला तसा उद्या अजूनही चांगला लागेल. श्रोते समरस होऊन दाद देऊ लागले की, आम्ही ऑर्गन तबला सुध्दा एकरूप होऊन वाजवतो मग गाणाऱ्या कीर्तनकाराला स्फुरण चढते. शेवटी काय परमेश्वर त्याला हवे तसे आपल्याकडून करून घेतो. आपण निमित्त मात्र आहोत ही साऱ्या विधात्याची कृपा!''

कीर्तनात 'लळित' हा एक कीर्तन प्रकार आहे. कोकणात नारदीय कीर्तन परंपरेत लळिताचे विशेष महत्व आहे. उत्सवाच्या शेवटी उत्सवदेवता सिंहासनावर बसली आहे असे मानून तिच्या दरबारात नृत्य, नाट्य संवाद, भारुडे, गौळणी सादर केल्या जात असतं. अजूनही लळित कीर्तनाद्वारे सामाजिक रूढी, परंपरा यावरील भाष्य करून समाज प्रबोधन केले जाते. प्रेक्षकांचे सुंदर पद्धतीने मनोरंजन करणारी ही कला आहे. भजन कीर्तन भारूड, गोंधळ, वासुदेव , वाघ्या-मुरळी अशा अनेक लोककला समाजाचे हीत कशात आहे हे जाणीवपूर्वक सांगणारी माध्यम आहेत. ही माध्यमं जीवनाचे अवलोकन आणि चिंतन सोप्या भाषेत सांगून लोकांच्या डोळ्यात अंजन घालण्याचे काम करतात.

कोरोनाकाळात कीर्तनकारांनी आपल्या मनाला उभारी देणारी कीर्तन फेसबुक, युट्यूबव्दारे सादर करून हे ही शक्य आहे याची जाणीव करून दिली. आपण सर्व भितीच्या छायेत असताना परमेश्वराच्या भक्तीमध्ये लीन होऊ शकतो हा आशावाद घालून दिला. सलग १००/१०० दिवस कीर्तनं अखंड हरिनामाची गोडी लागण्यासाठी फेसबुकवरून 'दादर कीर्तन विद्यालयातून' सादर केली गेली. बाहेर पडण्याची भिती असून तबला, पेटी,साथीदार आणि कीर्तनकारांनी उचलेले हे शिवधनुष्यचं होते. मंदीरे सर्व प्रार्थनास्थळे बंद असताना कीर्तनेही बंद. त्यावेळी कीर्तनं हाच पोटापाण्याचा आधार असणाऱ्याचे खूप हाल झाले. तसेच साथीदार सुद्धा फारच हलाखीचे जीवन जगत होते. ही परिस्थिती किती दिवस राहील हेही सांगता येत नव्हते. अशावेळी तरुण कीर्तनकार विवेकबुआ गोखले यांनी स्वत:ची FD मोडून साथीदार व कीर्तनकारांना पैसे दिले. ही गोष्ट त्यांनी वडिलांना सांगितली तेव्हा वडिलांनीसुद्धा ''माझीही FD घे. पण कीर्तनकार जगला पाहीजे.'' असा सकारात्मक पाठींबा दिला. त्यानंतर त्यांनी (गोखले बुआंनी) अनेक कीर्तन फेसबुकवरून केली. मग आपल्या परदेशी गेलेल्या लोकांनी आर्थिक मदतीचा ओघ गोखलेबुवांकडे दिला. त्यांनी कोकणापासून मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक सर्व कीर्तनकारांना आणि साथीदारांना पैसे पोहोचवले. काळ बदललें पण कोरोना काळात गोखलेबुवांनी, एका तरुण कीर्तनकारानी केलेली मदत कोणी विसरणार नाही.

परवाच कीर्तनाबद्दल चर्चा चालू असताना एका गृहस्थांनी मला विचारले ''तुमच्याबरोबर कीर्तनाला मागे किती लोक उभे असतात?'' त्यावेळी मी त्यांना म्हटले ''अहो, मी नारदीय कीर्तन करते. नारदीय कीर्तनाला तबला पेटी, तंबोरा, पखवाज, व्हायोलिन ही जास्तीत जास्त वाद्यं लागतात. पण नुसत्या तबला, पेटीबरोबरही कीर्तनकार कीर्तन करतो. तुम्ही म्हणता ते वारकरी कीर्तन असेल. त्याला एक मुख्य कीर्तनकार आणि बाकीचे इतर लोक त्यांच्या मागून अभंग गायन करतात.'' वारकरी सांप्रदाय कीर्तनात मुख्य विषय 'पंढरपुरचा पांडुरंग' आणि 'रखुमाई' यांच्या नामगजरात साधुसंतांच्या, भक्तांच्या कथांचे वर्णन केले जाते या वारकरी कीर्तनात दुतर्फा टाळकरी वीणेकरी मृदंगवादक, पखवाजवादक, पेटीवादक असा समूह श्रोत्यांपुढे कीर्तन करतो.

गेल्या काही वर्षात टीव्ही, रेडिओ स्मार्टफोन वरील प्रसिद्ध माध्यमांनी वारकरी संप्रदायाच्या कीर्तनास आधार दिल्याने ते कीर्तन प्रभावीपणे लोकांच्या समोर आले. नारदीय व रामदासी कीर्तन युट्यूब वर सहज उपलब्ध झाल्यामुळे जेव्हा हवे तेव्हा बघू शकतो अथवा बंद करू शकतो.

भारतात यंत्रयुग येण्यापूर्वी म्हणजे सुमारे दोनशे वर्षापूर्वी महाराष्ट्रातील मराठी भाषिक समाजात कीर्तनाला राजाश्रय व लोकाश्रय मिळाला होता. राजेशाही संपुष्टात आली आणि लोकाश्रय मिळाला. वैयक्तिक जीवनात फार मोठे बदल वेगाने झाले एकत्र कुटूंब पध्दत मोडकळीस आली व्यक्तिस्वातंत्र्य, आधुनिक शिक्षण पध्दत, संस्कृती व सामाजिक परिस्थिती वंचित होऊ लागली. कीर्तन, प्रवचन प्रकार उपेक्षित व वंचित होऊ लागला. फारसं अर्थार्जन मिळत नसल्याने कीर्तनकार कमी प्रमाणात होऊ लागले.

समाजप्रबोधन, भक्तीभावातून मिळणारी मानसिक शांतता, भक्तीची विचारधारा, संस्कार, संस्कृती हे सुद्धा टिकवून ठेवायचे असेल तर नवे विषय घेऊन शाळा- शाळातून सुध्दा कीर्तन झाले तर लहानपणापासून कीर्तनाचे संस्कार घडतील. केवळ मंदिरातच नाही तर अनेक ठिकाणी कीर्तनं साकार व्हावी अशी मनोकामना पूर्ण करावी ही परमेश्वराकडे प्रार्थना करते.



**सौ. प्रणाली पटवर्धन**
९९६९०२२१२५ (कीर्तनकार)




**Shop no A-01 Suvas Apartment, Hanuman Road,**
**Opp McDonald's Vileparle (East) Mum:- 400057**

# ‘श्वास’चा प्रकाशन सोहळा




मायमिरर पब्लिकेशनने प्रकाशित केलेले व सुप्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. शशिकांत वैद्य यांनी अनुवादित केलेले ‘श्वास’ हे पुस्तक १० जून २०२३ रोजी केशवराव घैसास सभागृहात प्रकाशित झाले. मूळलेखक जेम्स नेस्टर यांच्या ‘Breath’ ह्या आजमितीच्या सर्वाधिक खपाच्या पुस्तकाचा अनुवाद अत्यंत सोप्या भाषेत करण्यात डॉ. वैद्य यांना यश आले आहे. ह्या प्रकाशन समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून सुप्रसिद्ध शास्त्रीय व नाट्य संगीत गायिका सौ. आशाताई खाडिलकर उपस्थित होत्या.

प्रख्यात श्वसनरोगतज्ञ म्हणून सर्वज्ञात असलेले डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई हे प्रमुख वक्ते म्हणून हजर होते. अध्यक्षपदाची धुरा उद्योजक व अर्थतज्ञ श्री दीपक घैसास यांनी सांभाळली.

पुस्तक प्रकाशनापूर्वी एक चित्रफीत दाखविण्यात आली. त्यातील निवेदन सुप्रसिद्ध अभिनेते सचिन खेडेकर यांनी केल्यामुळे सुरुवातीपासूनच कार्यक्रम रंगत गेला. या चित्रफितीत जेष्ठ नाट्यकर्मी श्री माधवराव खाडिलकर, कोविड महामारीत योध्याचे काम केलेले डॉ. अनिकेत लाठी, विशेष पदक विजेत्या जलतरणपटू मेधाली रेडकर व केया प्रभू तसेच शिवछत्रपती विजेता जलतरणपटू तुषार गितये यांची हजेरी होती. तसेच सुप्रसिद्ध गायक श्री शंकर महादेवन यांच्या व्यक्तिगत शुभेच्छा डॉ.वैद्य यांना व श्वास या पुस्तकाला मिळाल्या. कार्यक्रमाचा उच्चबिंदू ठरला तो पंडित राकेश चौरसिया यांच्या बासरी वादनाचा थक्क करून गेलेला बासरीतील ’दीर्घ न्यास’ हा स्वर. या स्वरानी सर्वांची मने जिंकली. यात महत्वाचे म्हणजे स्वत: लेखकाने म्हणजेच जेम्स नेस्टर यांनी आपणहून दाखविलेली झूमद्वारे उपस्थिती.

मनोगत व्यक्त करताना डॉ. शशिकांत वैद्य यांनी आपले शालेय शिक्षण मराठीत झाल्याचा उल्लेख करून भाषेप्रती आपले ऋण व्यक्त केले व प्रकाशक आणि लेखक असलेल्या श्री. मनोज आंबिके यांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सौ. आशाताईनी संगीत व ध्यान यातील अतूट नाते विस्ताराने विशद केले. डॉ. प्रभुदेसाईनी श्वासाचे विकार व योग्य श्वासपद्धती यावर अभ्यासपूर्ण विवेचन केले.

श्री दीपक घैसास यांनी श्रोत्यांना आपल्या नम्र- विनोदी भाषणाने खिळवून ठेवले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनुजा वैद्य - लाठी व डॉ. अमोल वैद्य यांनी केले. कार्यक्रमाची सांगता डॉ. अनुजा यांनी म्हटलेल्या संपूर्ण पसायदानाने झाली. अशा रितीने एक परिपूर्ण व सुनियोजित असा पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितित संपन्न झाला.

# ‘अंतरीचा ज्ञानदिवा’ चे प्रकाशन!



विलेपार्ले येथील साठ्ये महाविद्यालयातील नाट्यगृहात १० जून २०२३ रोजी ‘विश्वभरारी फाऊंडेशन’ आणि ‘विघ्नेश पुस्तक भांडार’ यांच्या संयुक्त विद्यमाने एक साहित्यिक सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या पूर्वार्धात, लेखक श्री आशुतोष उकिडवे यांच्या ‘अंतरीचा ज्ञानदिवा’ या पुस्तकाचे प्रकाशन, प्रमुख पाहुण्या ‘न्यायमूर्ती मृदुला भाटकर (निवृत्त, मुंबई उच्च न्यायालय)’ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी व्यासपिठावर जेष्ठ लेखिका श्रीमती माधवी कुंटे, विपुलश्री मासिकाच्या संपादिका श्रीमती माधुरी वैद्य आणि प्रकाशक श्री. विघ्नेश गोखले आदी मान्यवरही उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, कवयित्री, लेखिका व ‘भरारी’ प्रकाशनाच्या सर्वेसर्वा श्रीमती लता गुठे यांनी केले. ACP श्री अविनाश धर्माधिकारी यांच्यासारखी अनेक कीर्तिवंत आणि प्रतिष्टीत मंडळी कार्यक्रमाला उपस्थित होती.

श्री. उकिडवे यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना ‘अंतरीचा ज्ञानदिवा’ या पुस्तकाची पूर्वपिठीका सांगितली. त्यात ते असं म्हणाले त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातल्या अतिशय अस्वस्थ करणाऱ्या काही अनुभवांवर आधारित असे एक सदर त्यांनी, ‘बेळगाव तरुण भारत’ या वृत्तपत्राच्या ‘अक्षरयात्रा’ या पुरवणीसाठी २०१९-२० या वर्षात लिहिले. प्रत्येक लेखाला महाराष्ट्र आणि कर्नाटक अशा दोन्ही राज्यातल्या वाचकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. या लेखांचे संकलित स्वरूप म्हणजेच सदर पुस्तक. तसेच मृदुला भाटकर यांनी प्रत्येक लेखातून अनुभवास येणारी लेखकाची सकारात्मकता आणि पुस्तकाची शब्दकळा व भाषाशैली याचे विशेष कौतुक केले.

त्यानंतर सदर पुस्तकातील ‘सुरंगा’ नामक एका लेखाचे अभिवाचन पुण्याचे नाट्यकर्मी ‘श्री. देवेंद्र भिडे’ यांनी त्यांच्या अतिशय जिवंत व परिणामकारक शैलीतून केले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात ‘विपुलश्री’ मासिकाच्या संपादक माधुरी वैद्य यांचा सत्कार करण्यात आला तसेच लेखिका माधवी कुंटे यांनी त्यांची प्रगट मुलाखत घेतली. मुलाखती दरम्यान माधुरी वैद्य या खूप मोकळेपणाने आणि अतिशय जिव्हाळयाने व्यक्त झाल्या. त्यांचा गेल्या दोन तपांचा प्रवास, उद्भवलेल्या अनंत घरगुती व व्यावसायीक अडचणी, त्यातून त्यांनी व त्यांच्या समग्र चमूने काढलेला मार्ग, लेखक व वाचकांचे आलेले काही मजेशीर तर काही उदबोधक असे अनुभव असे विविध किस्से त्यांनी सांगितले. अखेरीस माधुरी वैद्य यांना शुभेच्छा देऊन अनौपचारिक रंगलेल्या या गप्पा व मुलाखतीची समाप्ती माधवी कुंटे यांनी केली. संपूर्ण कार्यक्रम अतिशय आटोपशीर व सुनियोजितपणे पार पडला. त्यादिवशी पार्ल्यात चार सांस्कृतिक व साहित्यिक कार्यक्रमही होते. तरीही जवळपास १०० श्रोत्यांची उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली यांमुळे सदर कार्यक्रम स्मरणीय आणि आनंददायी झाला.

# आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत पार्ले टिळक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना घवघवीत यश!

राष्ट्रीय क्रिडा संकुल, रांगशाल थामिल, नेपाळ येथे २५ ते २८ मे २०२३ रोजी १४ वी आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत पार्ले टिळक विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले आहे. या स्पर्धेत श्राव्य कांबळे या विद्यार्थ्याने सुवर्ण आणि



रौप्य पदकांबरोबरच ३कांस्य पदकांवर आपले नाव कोरले आहे. तर काव्य घोलम या विद्यार्थ्याने १ सुवर्ण तर ३ कांस्यपदकं पटकावली. त्याचबरोबर पार्ले टिळक विद्यालयाच्या इंग्रजी माध्यमातील शर्विल साळवी या विद्यार्थ्याने १ सुवर्ण तर २ कांस्यपदकं मिळवली, तसेच मनस्वी कुंभार या विद्यार्थीनीने देखील १ रौप्य पदक व १ कांस्य पदक मिळवले आहे. त्याचबरोबर स्वरा राऊत या विद्यार्थीनीने प्रत्येकी १सुवर्ण व रौप्य पदकांसोबत २ कांस्यपदकं देखील मिळवली तर कनक पेरवे या विद्यार्थ्याने १ रौप्य पदक तर १ कांस्य पदक मिळवलं. तसेच ऋषभ शिंदे या विद्यार्थ्याने प्रत्येकी २ रौप्य व कांस्यपदकं मिळवली, तर अंगद कांदळगावकर व प्रियांशू सावंत या विद्यार्थ्यांनी प्रत्येकी २ कांस्यपदकं मिळवली आहेत. या स्पर्धेत एकूण ३० पदकांसोबत टीम इंडिया ने तिसऱ्या क्रमांकाची टीम ट्रॉफी देखील जिंकली. विद्यार्थ्यांच्या या यशात या स्पर्धेचे अंतरराष्ट्रीय प्रशिक्षक अरविंद चव्हाण, सहायक प्रशिक्षक विभावली चव्हाण व संघ व्यवस्थापक सुनीता शिंदे या सर्वांचा देखील मोठा वाटा आहे. सर्व पार्लेकरांतर्फे या संपूर्ण टीमचे हार्दिक अभिनंदन !

# विलेपार्ले येथील काव्यमैफिल !




महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्राच्या ६२ व्या वर्धापनदिनानिमित्त ’मटा कॅलिडोस्कोप’ या संकल्पनेअंतर्गत मुंबईत विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये शुक्रवार दिनांक १६ जून रोजी विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघ येथे ’कविता रूजुनी येती’ हा विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये कवी - अभिनेते किशोर कदम उर्फ सौमित्र, गीतकार - कवी गुरु ठाकूर, अभिनेत्री - गायिका मधुराणी प्रभुलकर आणि कवयित्री - अभिनेत्री समृहा जोशी हे कलाकार सहभागी झाले होते. अभिनेत्री-निवेदक डॉ. समीरा गुजर-जोशीने या चारही कवी आणि कवयित्रींशी संवाद साधला. या कार्यक्रमात कविता, त्यामागची कहाणी, कविता आणि गीतरचनेचा प्रवास, काव्यरचनेची प्रक्रिया अशा विविध विषयांवर संवाद रंगला. ’महाराष्ट्र टाइम्स’ चे वरिष्ठ पत्रकार श्रीकांत बोजेवार यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या मान्यवरांचे स्वागत केले. लोकमान्य सेवा संघाचे कार्यवाह महेश काळे यांनी संस्थेतर्फे मनोगत व्यक्त केले तर कार्याध्यक्ष उदय तारदाळकर यांनी संस्थेतर्फे स्मृतीचिन्ह देऊन उपस्थितांच स्वागत केलं. ’महाराष्ट्र टाइम्स’ चे वृत्तसंपादक राजीव काळे यांनी कार्यक्रमाच प्रास्ताविक केलं तर महाराष्ट्र टाइम्स चे हर्षल मळेकर यांनी कार्यक्रमाच सूत्रसंचालन केलं. या काव्यमैफलीला रसिक प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिला.

(सौजन्य - महाराष्ट्र टाइम्स)

# ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षितता!!



संपूर्ण जगामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेला जास्त प्राधान्य दिले जाते. भारत देश देखील त्याला अपवाद नाही. सुरक्षिततेसंबंधी सरकारतर्फे आणि पोलीस खात्यातर्फे विशेष उपाययोजना केल्या जातात आणि त्या अनुषंगाने विशेष उपक्रमदेखील राबविले जातात. परंतु या सर्व उपाययोजनांना अपेक्षित प्रसिद्धी दिली जात नाही. त्यामुळे सर्वसाधारण नागरिक आणि ज्येष्ठ नागरिक याबाबत अनभिज्ञ आहेत. काही सामाजिक संस्थादेखील या क्षेत्रामध्ये अतिशय मोलाचे काम करीत आहेत.

विलेपार्ले परिसरात ज्येष्ठ नागरिकांची संख्या खूप मोठी आहे त्यांची मुलं परदेशामध्ये शिक्षण,



नोकरी निमित्त गेली असल्यामुळे या ठिकाणी वयस्कर आई-वडील किंवा एकट्या आई किंवा एकटे वडील असे राहण्यासाठी आहेत. पोलिसांकडून त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून अशा एकट्या राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची यादी बनवली जाते आणि त्यांच्या घरी बीट अधिकारी अथवा आमदार नियमितपणे भेट देतात. त्यांना आवश्यक ती मदत करतात एवढेच काय अगदी औषध- पाणी करणे, वयस्कर नागरिकांचा वाढदिवस साजरा करणे, त्यांच्याशी गप्पा मारणे असे उपक्रम देखील राबवले जातात. लोकमान्य सेवा संघाच्या मार्फत ज्येष्ठ नागरिकांची माहिती नियमितपणे अद्यावत केली जाते. पोलीस आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यामध्ये समन्वयक साधण्याची भूमिका लोकमान्य सेवा संघ मार्फत केली त्या दृष्टीने त्यांचा खूप उपयोग पोलिसांना होतो.

ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षितता संदर्भात महत्त्वाचे मुद्दे समजावून घेण्याच्या दृष्टीने. काही वस्तुस्थितीसदृश्य घटना (दंतकथा नाहीत) या ठिकाणी उद्युक्त करू इच्छितो जेणेकरून ही माहिती अधिक सुरसआणि सहज समजणारी तसेच सर्वसाधारण लोकांनादेखील वाचनीय होईल. कोणतीही माहिती कथेच्या स्वरूपात सादर, केल्यास अधिक अवगत होते, हे नैसर्गिक तत्त्व आहे.

एक वयोवृद्ध स्त्री साकीनाका विभागातील एका शाळेजवळून दुपारच्या वेळी जात असताना दोन गृहस्थ तिला भेटले व त्या स्त्रीला त्यांनी सांगितले, की त्यांच्या शेठला मुलगा झाला आहे. त्यामुळे गल्लीच्या टोकाला ते महिलांसाठी फुकट साडीवाटप करीत आहेत. त्याकरित दाग दागिने काढून पर्समध्ये ठेवा आणि पुढे जा. त्या महिलेला काही सुचले नाही, ते सांगतील त्याप्रमाणे त्या करत गेल्या त्यांनी स्वत:हून अंगावरील दागिने काढून त्यांच्या समक्ष रुमालात ठेवले. त्यांनी तो रूमाल तिच्या पर्समध्ये ठेवला परंतु रुमालातील दागिने कधी काढून घेतले हे त्या महिलेला कळलेदेखील नाही. पुढे काही अंतर चालत आल्यानंतर झाला प्रकार तिच्या लक्षात आला व तिने जमिनीवर बसकण मारली.




आजकाल मोबाईल फोनवरून बरेच आर्थिक व्यवहार केले जातात बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांची मुले अथवा मुली परदेशात असल्याने त्यांचा देखील आग्रह असतो की त्यांच्या आई-वडिलांनी नेट बँकिंग करावे परंतु खूप मोठ्या प्रमाणामध्ये ज्येष्ठ नागरिकांची यामध्ये फसगत झाल्याचे आढळून आलेले आहे. बँकेचा प्रतिनिधी म्हणून त्यांना फोन करून त्यांची फसवणूक करून आवश्यक ती गोपनीय माहिती प्राप्त करून लाखो रुपयांचा गंडा घातल्याच्या घटना घडलेल्या आहेत.

अंधेरी येथील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये सन २०१० मध्ये एक वृद्ध दांपत्यांची निर्गुण हत्या त्यांच्या राहत्या घरामध्ये डोक्यात लोखंडी रॉड मारून केल्याचे आढळून आले. त्यांचे रक्त गॅलरीतील पाणी वाहून जाण्याच्या पाईप मधून खाली पडल्याने लोकांना संशय आला आणि त्यांनी पोलिसांना पाचारण केले पुढील तपासामध्ये असे आढळून आले की ही हत्या त्यांच्या मुलानेच केली होती.

विलेपार्लेमध्ये देखील ज्येष्ठ नागरिकांच्या निर्घुण हत्यांच्या घटना घडलेल्या आहेत.

कोविड प्रादुर्भावाच्या काळात एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचे खूप हाल झाले होते त्यांना मुंबई पोलिसांनी वेळोवेळी खूप मदत केली. काही ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिकतेवरती देखील याचा विपरीत परिणाम झाला होता आणि त्याचेच ज्वलंत उदाहरण म्हणजे कोविडच्या काळामध्ये प्रार्थना समाज रोड विलेपार्ले पूर्व येथे राहणाऱ्या वृद्ध डॉक्टर व्यक्तीने विषाचे इंजेक्शन देऊन मुलीचा खून केला पत्नीचा खून करण्याचा प्रयत्न केला आणि स्वत: आत्महत्या केली. पत्नीला दिलेल्या इंजेक्शनचा अपेक्षित परिणाम झाला नाही त्यामुळे पत्नी वाचली. मानसिक वैफल्यग्रस्त अवस्थेमध्ये झालेले हे कृत्य होते. त्याचप्रमाणे कोविडच्या काळामध्ये कोणतेही काम धंदा नव्हता उपजीविकेचे कोणतेही साधन नव्हते त्यामुळे एका वयोवृद्ध स्त्रीचा संभाळ विलेपार्ले पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी सुमारे दीड महिना केला होता त्यानंतर त्यांना लोणावळा जवळील सहारा वृद्धाश्रम या ठिकाणी दाखल केले होते आणि सुमारे एक वर्ष त्या वृद्धाश्रमामध्ये आनंदाने राहत होत्या. त्यानंतर त्यांना काही नातेवाईकांनी मदतीचा हात दिला आणि त्या स्वत:च्या पायावर पुन्हा उभा राहिल्या.

वरील सर्व घटनांमध्ये आपल्या लक्षात आले असेल की बळी पडलेली व्यक्ती ही ज्येष्ठ नागरिक होती.

मुंबईमध्ये अशा प्रकारे ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात घडणाऱ्या घटनांमुळे सर्वसाधारण जनतेमध्ये रोष निर्माण होऊन पोलिसांच्या क्षमतेबाबत शंका निर्माण होते. पोलिसांचे सर्वात महत्त्वाचे कर्तव्य म्हणजे गुन्ह्यास प्रतिबंध करणे म्हणजेच गुन्हा पुन्हा घडूच नये याकरता सर्वतोपरी प्रयत्न करणे. त्याचप्रमाणे शासनाची देखील जबाबदारी आहे की जेष्ठ नागरिकांची सुरक्षितता अबाधित राहील या दृष्टीने उपाययोजना करणे.

याच दृष्टिकोनातून केंद्र शासनाने सन २००७



मध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने एक विशेष कायदा अंमलात आणला आहे त्याचे नाव 'Maintenance and Welfare of Parents and Senior Citizens Act 2007' असे आहे. तसेच सन २०१८ मध्ये या कायद्यामध्ये काही सुधारणा देखील करण्यात आल्या आहेत. या कायद्याची व त्यातील तरतुदींची माहिती सर्वसाधारण जनतेला अद्याप अवगत झालेली नाही. या कायद्यातील तरतुदीनुसार सरकारवर जबाबदारी आहे की, त्यांनी जेष्ठ नागरिकांना शासकीय रुग्णालयांमध्ये आवश्यक ते सर्व औषधोपचार उपलब्ध करून दिले पाहिजेत. त्यांच्यासाठी जेष्ठ नागरिक निवारा केंद्र प्रत्येक जिल्ह्यामध्ये बांधले पाहिजे त्या ठिकाणी त्यांना आवश्यक त्या सुविधा देण्याची जबाबदारी टाकण्यात आलेली आहे.

एखाद्या ज्येष्ठ नागरिकांचा मुलगा अथवा मुलगी त्यांची देखभाल करत नसल्यास ते त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये तक्रार अर्ज करू शकतात. सदर तक्रार अर्ज ते स्वत: करू शकतात किंवा त्यांच्यातर्फे इतर व्यक्ती अथवा स्वयंसेवी संस्था देखील करू शकतात तसेच रुपये दहा हजार पर्यंत महिना देखभाल खर्च ते प्राप्त करू शकतात.

सर्वसाधारणपणे आई-वडिलांची स्थावर अथवा जंगम मालमत्ता प्राप्त होईपर्यंत मुले त्यांची देखभाल करतात परंतु एकदा का मुलांच्या नावावर मालमत्ता नोंदणी झाली की ती मुले आई-वडिलांची देखभाल करत नाही हे लक्षात घेऊन या कायद्यातील महत्त्वाची तरतूद कलम २३ मध्ये करण्यात आलेली आहे त्यानुसार एखादा मुलगा अथवा मुलगी हा कायदा अमलात आल्यानंतर त्यांच्या आई-वडिलांची देखभाल करीत नसेल आणि त्यापूर्वी त्यांची मालमत्ता मुलाच्या किंवा मुलीच्या नावावर नोंदणी झाली असेल तर ती नोंदणी रद्द होऊ शकते.

त्याचप्रमाणे या कायद्यातील कलम २५ अन्वये जर मुलगा अथवा मुलगी ज्येष्ठ नागरिक असलेल्या आई-वडिलांची देखभाल करत नसेल किंवा त्यांना शारीरिक मानसिक त्रास देत असेल तर तीन महिन्याच्या कारावासाची शिक्षा किंवा रुपये ५०००/- दंडाची शिक्षा त्यांना ठोठावली जाऊ शकते. या कायद्याअंतर्गतचे गुन्हे दखलपात्र स्वरूपाचे असल्याने ज्येष्ठ नागरिक अथवा त्यांचे प्रतिनिधी याबाबत होणाऱ्या त्रासाविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल करू शकतात. जुलै २०१८ मध्ये अशा स्वरूपाचा गुन्हा शिवाजी पार्क पोलीस ठाणे, मुंबई येथे दाखल झालेला आहे. तसेच माननीय उच्च न्यायालयाने देखील एका प्रकरणांमध्ये पाल्य आपल्या ज्येष्ठ पालकांची देखभाल करत नसतील तर अशा पाल्यांना घराबाहेर काढण्याचे अधिकार देखील जेष्ठ नागरिकांना असल्याचा न्यायनिवाडा केलेला आहे.

सध्या भारतामध्ये एकूण लोकसंख्येच्या सात ते आठ टक्के लोकसंख्या ज्येष्ठ नागरिकांची आहे आणि सन २०२६ पर्यंत ती लोकसंख्या १० ते १२% पर्यंत जाण्याची शक्यता आहे. या

पान १० वर

# विसरलेले समाज - ३ : पंट नावाचा देश

हातशेपसुत ह्या इजिप्तच्या ख्रिस्तपूर्व पंधराव्या शतकातील राणीची कारकीर्द हा इजिप्तच्या प्राचीन साम्राज्याच्या सुवर्णकाळातील एक कालखंड आहे. त्याबद्दल मी पूर्वीही आम्ही पार्लेकर मध्ये लिहिलं होतं. आजच्या लक्झर गावानजीक पण नाईल नदीच्या पश्चिम तीरावर देअर अल बाहरी येथे हातशेपसुतचं भव्य देऊळ आहे. **(पहा पहिला फोटो)** त्या देवळातील



अनेक भित्तिचित्रांत तिच्या पंट (शीर्षकातील इजिप्तशियन चित्रलिपीत लिहिलेलं नाव पहा. त्याचा इजिप्तशियन उच्चार आहे Pwenet किंवा Pwene) देशाबरोबर व्यापारवृद्धीसाठी काढलेल्या मोहिमांची चित्रं आहेत **(पहा पुढचे दोन फोटो)**. सर्वसाधारणपणे एखाद्या राजाने





युद्धात मिळविलेल्या विजयांना जसं महत्व दिलं जातं (उदाहरणार्थ सम्राट रामेसिस दुसरा ह्याचा हिट्टाइट साम्राज्यावरील विजय अनेक चित्रांत जसा त्याच्या अबू सिम्बेलच्या देवळात ठळकपणे रेखाटलेला आहे) तितकंच महत्वाचं स्थान ह्या चित्रांना हातशेपसुतच्या देवळात दिलेलं आहे. ह्या देवळाबाहेरील एका वठलेल्या झाडाचं वाळकं खोडही पंटहून ख्रिस्तपूर्व १५०० च्या सुमारास आणलेल्या Myrrh (आपण ज्याला गुग्गुळ म्हणतो) झाडाचं आहे असं समजलं जातं (**पहा चौथा फोटो** पंटहून आणलेल्या Myrrh रोपांच्या भित्तिचित्राचा).

पंट देशाचे संदर्भ इतिहासात इजिप्तच्या अगदी पहिल्या (Old Kingdom) साम्राज्याच्या काळापासून म्हणजे ख्रिस्तपूर्व २५०० वर्षांपासून आढळतात. त्या पुरातन बखरींमधील पंटची वर्णनं मात्र फार कुतूहल निर्माण करणारी आहेत. एखादा लहान मुलगा, आईने 'मिळणार नाही' असं फर्मान काढल्यामुळे अप्राप्य अशा आईस्क्रीमच्या काडीकडे किंवा फुग्याकडे जसा आशाळभूतपणे बघेल - काहीशी तशीच भावना ह्या वर्णनांमधून व्यक्त होते आहे असं वाटतं. इजिप्तमध्ये सहजी न मिळणाऱ्या आणि फक्त समाजातील उच्चतम थरातील लोकांनाच परवडतील अशा विलासी वस्तू जिथे मुबलक आहेत असं ठिकाण म्हणजे पंट - असा एकूण ह्या बखरींचा सूर आहे.

देशोदेशी

पण असं होतं तरी काय पंट मध्ये ज्यासाठी ईजिप्तमधील प्रत्येक पिढीतील राजांनी पंटच्या व्यापारी मोहीमा काढल्या? तसंच त्या काळातील बखरींमध्ये जरी सभोवतालच्या जवळ जवळ सर्व राज्यांबरोबर (म्हणजे हिट्टाइट, असिरिया, कुश, नुबीया) वारंवार होणाऱ्या युद्धांची वर्णनं असली तरी पंट बरोबर काही नुसती कुरबुर झाल्याचा सुद्धा कुठे उल्लेख का आढळत नाही?

पहिल्या प्रश्नाचं उत्तर सोपं आहे. तिथून आणलेल्या वस्तूंची यादीच सम्राट मेंतुहोतेप तिसरा ह्याच्या कारकीर्दीत काढलेल्या एका



व्यापारी मोहिमेच्या बखरीत दिलेली आहे - सोनं, हस्तिदंत, शिसवीचं लाकूड, स्त्रियांच्या शृंगाराला लागणारे रंग, सुगंधी चूर्ण वगैरे, अनोखे प्राणी आणि त्यांची कातडी, दालचिनी, धूप आणि गुग्गुळ (त्या काळात अश्या पदार्थांना सोन्यासारखी किंमत मोजावी लागत असे) इत्यादी.

दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तर देणं मात्र कठीण आहे - आणि त्याचा संबंध पंट संबंधीच्या एका मोठ्या रहस्याशी आहे.

पंट हा देश नक्की होता कुठे ह्याचा खात्रीलायक पुरावा आजतागायत कोणालाही मिळालेला नाही. आज जी काही माहिती पंट बद्दल उपलब्ध आहे ती सर्वच्या सर्व फक्त ईजिप्शियन बखरी मधे मिळालेली आहे. पंटच्या अस्तित्वाची ह्या बखरींतील वर्णनांशी जुळणारी पण स्वतंत्र खूण कुठेही बाह्य जगात सापडलेली नाही. किंवा पंटवासियांनी मागे ठेवले आहेत असं म्हणता येईल असे कुठलेही अवशेष आज पर्यंत मिळालेले नाहीत. अर्थात असे अवशेष शोधायचे कुठे हेच मुळात माहित नसल्याचाही तो परिणाम आहे.

त्यामुळेच की काय पण पंटचा संबंध आफ्रिकेतील आजच्या, सोमालिया, इथिओपिया, इरिट्रिया, पासून मध्य-पूर्वेतील अरेबिया ते थेट श्रीलंका, भारतातील केरळ आणि इंडोनेशियातील जावा बेटापर्यंत वेगवेगळ्या संशोधकांनी जोडला आहे. हातशेपसुतच्या पंट मोहिमेच्या उपलब्ध वर्णनावरून असं दिसतं की इजिप्तशियन जहाजं इजिप्तच्या पूर्वेच्या समुद्रातून (आजचा रेड सी) दक्षिण-पूर्व दिशेने गेली. मात्र त्यातील भौगोलिक आणि प्रवासकाळा संबंधित उल्लेख इतके संदिग्ध आहेत की निव्वळ त्या वर्णनाच्या आधारावर वर दिलेल्या यादीतील कुठलीही जागा काढून टाकता येत नाही. अर्थात ईजिप्तशियन चित्रलिपीचं अचूक भाषांतर ही सोपी गोष्ट नाही. ही संदिग्धता अंशत: त्याचाही परिणाम असू शकते.

पण त्यामुळेच पंटच्या मोहिमांच्या बखरींतील इतर संदर्भ वापरून संशोधकांनी तऱ्हेतऱ्हेच्या उपपत्ती मांडल्या. आयात केलेल्या पदार्थांच्या यादीतील दालचिनी सारखे मसाल्याचे पदार्थ, किंवा गुग्गुळ इत्यादी भारत, श्री लंका किंवा इंडोनेशियात मुबलकपणे उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याशी पंटचा संबंध जोडला गेला. पण त्याच यादीतील बबून सारखे प्राणी काही भारत किंवा श्री लंकेत मिळत नाहीत. ते आफ्रिकेत आणि अरेबियन भूशिरातच सापडतात. आणि हत्ती आणि हस्तिदंत एकेकाळी भारत/श्री लंकेत मुबलक असले तरी जिराफ सारखे प्राणी किंवा सेक्रेटरी बर्ड सारखे पक्षी (ज्यांची चित्रं पंट मोहिमेच्या वर्णनात आहेत) फक्त आफ्रिकेतच आढळतात.

ह्या प्रवास वर्णनांवरून काढलेली पंटवासियांची आणि त्यांच्या गावांची काही चित्रं हातशेपसुतच्या देवळाच्या भिंतींवर आहेत. उदाहरणार्थ हा **पाचवा फोटो** - ह्यात पंटचा राजा



(फोटोतील उजवीकडील पहिली व्यक्ती) आणि त्याची राणी (राजाच्या मागे) चितारलेली आहेत असं समजलं जातं. त्यांचं रूप, कपडे वगैरे तत्कालीन इजिप्त किंवा सोमालियातील लोकांपेक्षा फार वेगळे दिसत नाहीत. किंवा **पहा सहावा फोटो** पंट मधील नागरिकांचा. हे ही



तत्कालीन आफ्रिकेतील रहिवाश्यांपेक्षा फारसे वेगळे दिसत नाहीत. ईजिप्तमधील थडग्यात सापडलेल्या बबूनच्या ममीतून (mummie) मिळविलेल्या DNA ची इथिओपिया/इरिट्रियात आढळणाऱ्या बबूनच्या DNA बरोबर तुलना करून असाही निष्कर्ष काढला गेला कि इजिप्तमध्ये थडग्यात पुरलेले बबून आजच्या इथिओपिया/इरिट्रियातील बबूनचे पूर्वज असले पाहिजेत, म्हणून पंट देश ह्या भागात असला पाहिजे.

मात्र पंट मधून फक्त देह सुखाच्या वस्तूंचे आयात केल्या गेल्या असं नाही. तर काही आध्यात्मिक प्रभावही कदाचित इजिप्तमध्ये आणला गेला असावा. प्राचीन इजिप्तमधील बेस नावाचा देव (संगीत, आनंद आणि बाळंतपण ह्यांचा देव) पंट मधून आयात केलेला देव आहे असं समजलं जातं.

इजिप्तच्या चित्रलिपीत पंटचा उल्लेख कित्येक ठिकाणी  ह्या चित्राने केला जातो. ह्या चिन्हाचा शब्दश: अर्थ आहे देवभूमी (Land

पान १० वर

पान ८ वरून

## ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षितता!!

दृष्टिकोनातुन राज्य शासनातर्फे देखील जेष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अनेक उपाययोजना केलेल्या आहेत आणि प्रस्तावित देखील आहेत. त्यापैकी लक्षणीय योजना म्हणजे पाल्य आपल्या ज्येष्ठ नागरिक असलेल्या पालकांची देखभाल करत असल्यास त्यांना



आयकर मध्ये सूट देण्याचा प्रस्ताव देखील विचाराधी आहे.

नुकताच राज्य शासनाने ८५ वर्षे वयोमानावरील ज्येष्ठ नागरिकांना बस द्वारे मोफत प्रवास करण्याची मुभा उपलब्ध करून दिली आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने मुंबई पोलिसांनी हेल्पलाइन सुरू केलेली आहे. त्याचे क्रमांक १०९०, १०३, १०० इत्यादी आहेत. मुंबई पोलिसांचे अधिकारी अंमलदार ज्येष्ठ नागरिकांच्या घरी भेटीस आले असता ज्येष्ठ नागरिकांनी देखील त्यांचे योग्य ते स्वागत करणे आणि  आवश्यक त्याच सेवेची अपेक्षा करणे गरजेचे आहे. काही ज्येष्ठ नागरिक वैयक्तिक कामे देखील पोलिसांना सांगत असल्याचे निदर्शनास आले आहे. असे  वागणे योग्य वाटत नाही त्यामुळे उपलब्ध करून दिलेल्या सोयीचा गैरफायदा घेतला जातो आणि आवश्यक ते परिणाम साध्य होत नाहीत. ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या घरी येणाऱ्या पोलिसांची त्यांनी प्राप्त केलेल्या ज्ञानाचे आणि त्यांच्या अनुभवाचे कथन जरूर करावे जेणेकरून पोलिसांच्या ज्ञानात देखील भर पडेल.  ज्येष्ठ नागरिकांकडे ज्ञानाचे व अनुभवाचे भांडार असते ते त्यांनी पोलिसांबरोबर शेअर केल्यास त्या पोलीस अधिकाऱ्याचा विचार आणि आचरणामध्ये निश्चितच सकारात्मक बदल घडेल आणि एक सुदृढ समाज संस्था प्रस्थापित होण्यास ज्येष्ठ नागरिकांचा अशा प्रकारे हातभार लागेल असे मला वाटते. या ठिकाणी मी Todd Henry यांच्या Die Empty  या पुस्तकातील अर्थपूर्ण वाक्याने या लेखाची सांगता करीत आहे.

"The cost of inaction is vast, Don't go to your grave with best work inside you, choose to die empty"



**(अविनाश धर्माधिकारी)**
निवृत पोलीस उपअधीक्षक
महाराष्ट्र पोलीस, मो. न. ९९३०६८५८३१

पान ९ वरून

## विसरलेले समाज - ३ : पंट नावाचा देश

of Gods). आमेनहोतेप तिसरा ह्याच्या देवळातील एका शिलालेखात देवाधिदेव आमून ह्याने आमेनहोतेपला पाठविलेला  एक संदेश कोरलेला आहे. त्यात आमून असं म्हणतो - ''मी सूर्योदयाच्या दिशेला तुझ्या साठी एक आश्चर्य घडविलेलं आहे. सुगंधी फुलं आणि आरोग्यदायी हवा असलेल्या ह्या पंट नावाच्या प्रदेशापासून तुला शांती मिळो''.

कदाचित ''पंट म्हणजे आमूनची देवभूमी'' अशा भावनेच्या प्रभावामुळे कदाचित असेल पण जरी बाकी सर्व आजूबाजूच्या प्रदेशांबरोबर (असिरिया, नुबीया, कुश इत्यादी) इजिप्तच्या राजांनी सतत मारामाऱ्या केल्या असल्या तरी पंट बरोबरचे त्यांचे संबंध सौहार्दाचे असावेत. अर्थात ह्याचं दुसरं कारण पूर्णपणे व्यावहारिकही असू शकतं. कारण पंट नक्की कुठे होता ह्या बद्दल कितीही वाद असले तरी तो इजिप्त पासून खूप दूरवर कुठेतरी होता एव्हढं मात्र वादातीत आहे. अश्या दूरच्या प्रदेशात जाऊन युद्ध करण्यासाठी लागणारी रसदपुरवठा आणि सैन्याच्या दळणवळणाची यंत्रणा उभारण्यातील अशक्यता पाहूनही तत्कालीन इजिप्तच्या राजांनी व्यापाराचा सुज्ञ मार्ग अंगिकारला असेल.


विस्मृतीत गेलेल्या अनेक समाजांबद्दल पुरातत्वशास्त्रज्ञांनी गेला एक दोन शतकांत खूप माहिती गोळा करून मानवी समाजाच्या जडण-घडणीच्या इतिहासातील अनेक महत्वाचे अध्याय आपल्यापुढे आणले. त्यातील पंटचं वैशिष्ठय असं की त्याबद्दलच्या सर्व माहितीसाठी आपल्याला दुसऱ्या कोणीतरी केलेल्या त्यांच्या वर्णनावरच अवलंबवावं लागतं. त्यांनी स्वत: बद्दल नमूद केलेलं किंवा त्यांनी स्वत: मागे ठेवलेलं काहीही (लिखाण, कलेचे नमुने, इमारतींचे अवशेष, थडगी, धर्मस्थळं असं काहीही) आजतागायत सापडलेलं नाही. त्यामुळे पंट बद्दलचं हे गूढ भविष्यातही सहजासहजी उलगडेल असं दिसत नाही.

प्रत्यक्ष इजिप्तच्या भेटी दरम्यान हातशेपसुतच्या देवळातील माहिती पत्रकं आणि कैरोतील म्युझियममधून पंट बद्दल मिळविलेल्या माहिती व्यतिरिक्त ज्यांचा मुख्य आधार हा लेख लिहिण्यासाठी मी घेतला त्यांच्या लिंक्स खाली दिल्या आहेत. फोटोंपैकी पहिले चार मी हातशेपसुतच्या देवळात काढलेले आहेत. बाकी दोन इंटरनेट वरून घेतलेले कारण मी काढलेले त्या दोन चित्रांचे फोटो चांगले आले नव्हते.

http://digital.library.upenn.edu/women/edwards/pharaohs/pharaohs-8.html

https://www.pbs.org/wgbh/nova/article/egypt-punt/

https://www.worldhistory.org/punt/



**सतीश जोशी**
९८२०२२८२७९

# इन्ही लोगोंने ले लीना दुपट्टा मेरा..पाकीझा

पत्नी मीना कुमारी च्या प्रेमात आकंठ बुडालेले चित्रपट निर्माते कमाल अमरोही यांना असा चित्रपट तयार करायचा होता ज्यामुळे त्यांचं इंडस्ट्रीमध्ये चित्रपट निर्माता म्हणून बस्तान बसेल



आणि त्यांची प्रेम कहाणी चित्रपट इतिहासाच्या पानांमध्ये कायमची दर्ज होईल आणि एक चित्रपट बनला  'पाकिझा'. पाकीझा म्हणजे स्वच्छ, नितळ, निर्मळ. हा हिंदी चित्रपट कथा, अभिनय, गीत, या सर्वच बाबतीत चित्रपटसृष्टीच्या इतिहासामध्ये एक मैलाचा दगड ठरला (A Milestone). मुजरा नाचणाऱ्या स्त्रीच्या, एका तवायफच्या आयुष्यावर बेतलेला चित्रपट असल्यामुळे या चित्रपटात मुजरा गीतांची रेलचेल आहे. चित्रपटातला पहिलाच मुजरा, इन्ही लोगो ने.. याबद्दल आज आपण बोलणार आहोत.



चित्रपटाची नायिका, साहिबजान मीनाकुमारी हिचा चित्रपटातील पहिला प्रवेश होतो, तोच मुजऱ्याने.. 'इन्ही लोगो ने ले लीना दुपट्टा मोरा' हे मुजरा गीत  ऐकताना रोमँटिक वाटतं पण त्यातील शब्दांमागे मोठा अर्थ आहे. स्त्रीची हतबलता आहे. स्त्रीचा दुपट्टा, पदर म्हणजे तिची शालीनता, सोज्वळता, निरागसता, तिचं स्वत्व आणि तिचा अभिमान हा कोणीतरी तिच्याकडून काढून घेतलाय. म्हणजे तिची लज्जा, तिचा स्वाभिमान, तिची निरागसता तिच्यापासून ओढून घेतली आहे. आपल्या स्वार्थासाठी शालीनतेच्या घरातून ओढून आणून तिला उंबरठ्यावर बसवलं आहे. आणि हे करणारे कोण आहेत ? तर दुसरे तिसरे कोणी नाहीत, आपल्याच समाजातील स्वत:ला प्रतिष्ठित समजणारे.  बजजवा.. भांडवलदार,  रंगरजवा.. कलासक्त कलाकार आणि सिपहीया म्हणजे साक्षात रक्षणकर्ते. सारेजण पैशांनी तिला खरेदी करू पाहात आहेत. नृत्यदिग्दर्शन गौरी शंकर यांचं अगदी तरुण वयातली गुलाबी पोशाखातली दागिन्यांनी मढलेली मीना दिसते ही सुंदर, नाचते ही सुंदर. आसपासचं नेपथ्य थेट पाकिस्तानातील मंडी बझार या परिसरावरून उचललेलं, लखनऊ मधल्या त्या चौकात नेणारं. त्यात काय नाही ? सजवलेला दिवाणखाना,बैठकीवर बसलेले रसिक,भोवताली तबला, सारंगी घेऊन साजिंदे. खिडकीतून आसपासच्या दिवाणखान्यातून दिसणाऱ्या, नाचणाऱ्या स्त्रिया. कुणी नशा करून आलेला. त्याला उचलून बाहेर टाकून दिलं जातंय. सगळं जिथल्या तिथे. उत्तम वातावरण निर्मिती, उत्तम दिग्दर्शन. संगीतकार गुलाम मोहम्मद स्वत: उत्कृष्ट तबला ढोलक वगैरे तालवादक होते. त्यामुळे त्यांनी गीतांना साजेसं संगीत दिलं आहे. त्यास शोभेसा मखमली स्वर लताबाईंचा. मूळ अवधी भाषेतील लोकगीतावरून गीतकार मजरूह सुलतानपुरी यांनी  लिहिलं आहे. हमरी.. रंगरजवा.. बजजवा.. कानांना गोड वाटतात. सुप्रसिद्ध सारंगीवादक पं. राम नारायण यांनी गीतासाठी सारंगी चे सूर दिले आहेत . गुलाम मोहम्मद यांनी सगळ्या गीतांचं संगीत पूर्ण केलं. पण या चित्रपटादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. आपल्या गाण्यांचं यश ते पाहू शकले नाहीत. चित्रपटाचं पार्श्वसंगीत तसंच गाण्यांचं उर्वरित काम संगीतकार नौशाद यांनी पूर्ण केलं. गुलाम महंम्मद यांनी एकूण ठुमरी गझल मुजरा कव्वाली अशी पंधरा गाणी तयार केली. त्यापैकी फक्त सहा चित्रपटात वापरली बाकी नऊ गाण्यांची रंग बरंग नावाने रेकॉर्ड निघाली.

नाममात्र एक रुपया मानधन घेऊन या चित्रपटात मीना कुमारीने काम केलं आहे. राजकुमार या गुणी अभिनेत्याची सलीमच्या भूमिकेसाठी निवड झाली. १६ जुलै १९५६ या दिवशी चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली. नंतर पती-पत्नी मधील वाढते वाद, मीनाचं नशेच्या आहारी जाणं, गंभीर आजारपण, यामुळे चित्रपट पूर्ण व्हायला सोळा वर्षं लागली. फिल्म रिलीज झाली आणि महिन्याभरात मीनाचा मृत्यू झाला. एका स्वप्न कथेचा दु:खद अंत झाला.



**अनुश्री क्षीरसागर**
९८२०५०९७६२

# आणीबाणी

काही मराठी चित्रपटांची नावेच उत्सुकता वाढवणारी असतात. असाच एक मराठी चित्रपट म्हणजे '**आणीबाणी**'. येत्या २८ जुलैला हा चित्रपट प्रदर्शित होतोय. आणीबाणीच्या काळाच्या पार्श्वभूमीवर सांगितलेली ही हलकी-




फुलकी गोष्ट आहे. या चित्रपटाचा नायक अभिमन्यू याच्या संघर्षाची ही गोष्ट आहे. एखाद्या सरकारी आदेशाची अंमलबजावणी करताना होणाऱ्या गोंधळाची, नवरा बायकोच्या प्रेमाची आणि सोबत बाप लेकाच्या नात्याची देखील ही गोष्ट आहे. राजकीय परिस्थितीवर आपल्या मिश्किल लिखाणाने यात प्रहार केला असून लेखक अरविद जगताप यांनी आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर ही रंजक कथा लिहिली आहे. '**आणीबाणी**' कोणासाठी अडचण ठरणार? आणि अडचणीत सापडलेले या '**आणीबाणी**' तून कसे बाहेर पडणार ? याची मनोरंजक कथा चित्रपटात मांडण्यात आली आहे. उपेंद्र लिमये, प्रवीण तरडे, सयाजी शिंदे, संजय खापरे, वीणा जामकर, उषा नाईक, प्राजक्ता हनमघर, सीमा कुलकर्णी, रोहित कोकाटे, सुनील अभ्यंकर, पद्मनाभ बिंड, किशोर नांदलस्कर अशा अनेक कलाकारांच्या या चित्रपटात भूमिका आहेत. कृष्णा जगताप, योगेश शिंदे, सचिन जगताप, अमोल महाडिक 'आणीबाणी' चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद अरविंद जगताप यांचे आहेत तर दिनेश जगताप हे चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत.

**मनोरंजन विश्व**

# डेट भेट


सध्या अनेक चित्रपट हे परदेशात चित्रित होत आहेत. असाच एक लंडनमध्ये चित्रित झालेला चित्रपटम्हणजे '**डेट भेट**'. सोनाली कुलकर्णी, हेमंत ढोमे आणि संतोष जुवेकर यांची प्रमुख भूमिका असलेला '**डेट भेट**' १४ जुलै रोजी प्रदर्शित होत आहे . '**डेट भेट**' चित्रपटाची कथा आणि दिग्दर्शन लोकेश विजय गुप्ते यांचे आहे. पटकथा व संवाद लेखन अश्विनी शेंडे यांनी केले आहे. प्रदीप खानविलकर हे सिनेमॅटोग्राफर आहेत. अमेय विनोद खोपकर एंटरटेनमेंट आणि झाबवा एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड प्रस्तुत '**डेट भेट**' या आगामी आगामी चित्रपटाचे पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले. '**डेट भेट**' ची निर्मिती शिवांशु पांडे , हितेश रुपारेलिया आणि स्वाती खोपकर यांनी केली आहे. निनाद नंदकुमार बत्तीन, तबरेज पटेल, प्रशांत शर्मा, हनी शर्मा यांनी सह निर्मिती केली आहे तसेच असोसिएट निर्माते प्रशांत शेळके हे आहेत. चिनार महेश या संगीतकार जोडीने चित्रपटाला संगीत दिले आहे . फिल्मअस्त्रा स्टुडिओजने चित्रपटाच्या वितरणाची जबाबदारी सांभाळली आहे .






गणेश आचवल
९८२१२६८३९१

Follow us on: @parlebazaar
पार्ले BAZAAR
Parlekars are searching
BUSINESSES & PROFESSIONALS
In & Around Vile Parle on
www.parlebazaar.com
Is Your Business Listed on Parlebazaar?



Basic Listing Free* Share Your Business Details
on parlebazaar1@gmail.com
Advertise on Parlebazaar.com & Reach
Thousands of Potential Customers in a Cost-Effective Way
Contact for Advt. 9769261182 / 8169825961 /9324875463
Email: marketing@parlebazaar.com

पार्ले BAZAAR www.parlebazaar.com
www.Parlebazaar.com
Vile Parle's own Business Platforms
NOW
BUSINESSES & PROFESSIONALS
IN VILE PARLE AT A CLICK!



"**Parlebazaar.com** is a joint venture between 'Aamhi Parlekar', a 31-year-old suburban newspaper, and 'Townparle.in', a digital e-magazine of Vile Parle. It is a section-wise business directory of Vile Parle, where visitors can easily view or search for information about businesses, products, and services. The website also features information on upcoming tours, real estate projects, dramas, happenings, vile parle in and around."

SCAN QR CODE &
SUBSCRIBE FOR FREE
GET REGULAR UPDATES ABOUT VILE PARLE.

IF YOU'RE A BUSINESS OWNER OR A PROFESSIONAL, ADVERTISE YOUR BUSINESS ON PARLEBAZAAR.COM AND REACH THOUSANDS OF POTENTIAL CUSTOMERS IN COST EFFECTIVE WAY !!
FOR ADVERTISING INQUIRIES, PLEASE CONTACT US ON
9769261182 / 8169825961 / 8104286202/ 9324875463
EMAIL: marketing@parlebazaar.com
www.parlebazaar.com

## परांजपे शाळेचे गुणवंत विद्यार्थी




कौशिक पांचाळ ९३.२०% | नम्रता परब ८८.००% | आरती मोरे ८६.००% | कृणाल गावडे ८४.६०% | अनुष्का घुगे ८४.४०%

## विले पार्ले म्युनिसिपल शाळेचे गुणवंत विद्यार्थी



विद्या गुप्ता ८८.८०% | ऋचिता पुजारी ८८.००% | कौशल्य कदम ८३.००% | अंतिमा गुप्ता ८०.२०% | रोहित गायकवाड ८०.००%

## प्रार्थना समाज हायस्कूल शाळेचे गुणवंत विद्यार्थी



विकास शर्मा ८८.००% | अंकुश दास ८६.००% | रोहित सुरडकर ७४.२०% | राजेश कुमावत ७३.८०% | गणेश माने ७३.००%

## विद्या पेठे यांच्या 'कथा मनातल्या जनातल्या' या कथासंग्रहास राज्यस्तरीय पुरस्कार

इचलकरंजी येथील आपटे वाचन मंदिराला २४ जून २०२३ रोजी १५० वर्षे पूर्ण झाली. या संस्थेमार्फत आदरणीय कवयित्री इंदिरा संत यांनी दिलेल्या देणगीतून उत्कृष्ट साहित्य कृतीला पुरस्कार दिला जातो. यावर्षी विद्या पेठे यांच्या 'कथा मनातल्या जनातल्या ' या कथासंग्रहाला दुसरा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे. या संस्थेमध्ये सुवर्ण महोत्सवी व्याख्यानमाला, साहित्य पुरस्कार, कथाकथन स्पर्धा, साहित्य गप्पा, मुलांसाठी पुस्तक हंडी इत्यादी कार्यक्रम चालतात. सध्या आपटे वाचन मंदिराच्या अध्यक्ष सुषमा दातार असून ,उपाध्यक्ष हर्षदा मराठे आहेत.




## श्री. माधवराव भागवत हायस्कूल (इंग्रजी माध्यम) शाळेचे गुणवंत विद्यार्थी



काव्या राणे-९७.६०% | परीजा गडरे-९७% | अदिती केळकर-९५.६०% | पल्लवी खानोलकर-९५.४०% | वेद कारंडे-९५.२०% | साहिल शेलार-९५.२०%

## ओरायन स्कुल (आयसीएसई) शाळेचे गुणवंत विद्यार्थी



इशान लोंढे ९९.४०% | आदित्य वर्तक ९९.२०% | आलिशा वर्तक ९९.२०% | संकेत नाबर ९९.२०% | सिध्देश खानोलकर ९९% | अनिकेत नाबर ९९% | मुग्धा सोनावणे ९८.४% | हितवी शाह ९७.४%

## श्री. माधवराव भागवत हायस्कूल (मराठी माध्यम) शाळेचे गुणवंत विद्यार्थी



स्नेहल शिगवण-९३.६०% | पियुष राऊत -९०% | तन्वी सावंत-८९.८०% | वेदांत सालप-८९.८०% | तन्मय मापेलकर-८९% | साक्षी मोहिते- ८७.२०% | महेक नाचणारे-८७.२०%


छत्रपती शिवाजी विद्यालय शाळेचे गुणवंत विद्यार्थी
श्रुती यादव ६६.८०%
प्राची वेलन ६५.८०%
मनीषा शिंदे ५८.६०%
आदित्य गिरी ५६.४०%
खुशी लोखंडे ४१.२०%
पार्ले टिळक विद्यालय (मराठी माध्यम) शाळेचे गुणवंत विद्यार्थी
श्रावणी धासरे-९७.८०%
धनश्री चव्हाण-९६.००%
अनया ठाकूर-९३.४०%
वैष्णवी गुरव-९२.४०%
पार्ले टिळक विद्यालय (इंग्रजी माध्यम) शाळेचे गुणवंत विद्यार्थी
पूर्वा लोंढे -१००%
तन्वी हावरे -९९.४०%
श्रावणी तरये -९९.४०%
तनिषा डिसूझा-९८.२०%
आर्या वर्टी - ९९.८०%
पार्ले टिळक विद्यालय (आयसीएसई) शाळेचे गुणवंत विद्यार्थी
ऋतुराज देशपांडे-९९.२०%
आरूश आरंके-९८.४०%
कल्याणी लिमये-९८.४०%
पार्थ रामटेके -९८.४०%
प्रशाम गांधी-९८.२०%
विमोह धावडे-९२.२०%


Property Expo
Get The Experience of
ONLINE PROPERTY EXPO
Throughout the Year
Book Your Booth Now
Become A Sponsor
SHOWCASING
Real Estate Projects | Consultants | Loans & Finances
Allied Products & Services
Reach Thousands of Prospective Buyers | Various Projects
Concurrent Online Seminars | Various Halls
Visit On:
www.onlinepropertyexpo.in
Supported By:
CREDAI-MCHI THANE UNIT
Property Expo
www.onlinepropertyexpo.in
24 / 7 / 365 Days Expo
FOR SPONSORSHIP
&
BOOTH BOOKING
Contact - 9769261181 / 8169825961
Email - onlinepropertyexpo365@gmail.com
Supported By
Practising Engineers Architects and Town Planners Association (India)
CREDAI-MCHI THANE UNIT